cmyk

## संपादकीय

### सहा महिन्यातच जनतेचा मूड बदलला

महाराष्ट्रातील विधानसभा २०२४ च्या निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले आहेत. राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट बहूमत दिले आहे. महायुतीचे २०० पेक्षा अधिक उमेदवार विजयी झाले आहेत. तर दुसऱ्या बाजूला मविआला ५० जागाही मिळालेल्या नाहीत. महायुतीच्या झालेल्या या एकतर्फी विजयामुळे राजकीय विश्लेषकांकडूनही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याच महायुतीचा अवघ्या ६ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत डब्बा गूल झाला होता. तर मविआचे सर्वाधिक उमेदवार विजयी झाले होते. मात्र फक्त ६ महिन्यात असे काय झाले? ज्यामुळे मतदारांनी त्यांचा निर्णय बदलत महायुतीला साथ दिली, याचे परिक्षण आणि आत्मनिरीक्षणही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी करण्याची आता गरज आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२१२ | रविवार, दि.२४ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### तारीख ठरली, २५ नोव्हेंबरला वानखेडे मैदानावर शपथविधी

मुंबई : राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. यामुळे, भाजप कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी आत्ताच भाजपचा मुख्यमंत्री होणार, देवेंद्र फडणवीस हेच पुन्हा मुख्यमंत्री होतील, अशा आशयाचे बॅनरही झळकवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे, महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा दावेदार कोण, असा प्रश्न यानिमित्ताने समोर आला आहे. त्यातच, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाचा शपथविधी २५ तारखेला होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. महाराष्ट्राचा नवीन सरकारमधील मुख्यमंत्री कोण हे कोडे लवकरच उलगडेल. राज्यातील विधानसभेचा कार्यकाळ २६ तारखेला संपत असल्यामुळे एक दिवस आधीच महायुती सरकार स्थापन करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# शेतकऱ्यांच्या नाराजीचा अंदाज फोल ठरला

## महाराष्ट्रामध्ये महायुतीची सरसी: सत्ता स्थापनेच्या हालचाली

**पुणे । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या संतापाचा दणका सत्ताधारी महायुतीला बसेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. त्यामध्ये मराठवाडा, विदर्भातील सोयाबीन कापूस उत्पादक मतपेटीतून नाराजी व्यक्त करेल, असा अंदाज बांधला जात होता. कारण ऐन आवकेच्या हंगामात सोयाबीन कापसाचे भाव पडलेले आहेत. त्यामुळे सोयाबीन कापूस उत्पादकपट्ट्यात महायुतीला शेतकरी नाराजी भोवेल अशी शक्यता होती. परंतु प्रत्यक्षात मात्र या दोन्ही प्रदेशात महायुतीला चांगले यश मिळाले. कांदा निर्यातबंदीचा लोकसभेत झटका बसल्याने तसाच रोष पुन्हा

◀◀ पान २ वर

| | |
|---|---|
| महायुती | २३० |
| मविआ | ४६ |
| सपा | २ |
| इतर | १० |

**पक्षीय बलाबल (एकुण जागा-२८८)**

| | |
|---|---|
| भाजप-१३२ | उबाठा सेना-२० |
| शिंदे सेना-५७ | काँग्रेस -१६ |
| अजित पवार-४१ | शरद पवार-१० |

**सत्तेचा मॅजीक आकडा-१४५**

## महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक विजय ; लाडक्या बहिणींनी अंडरकरंट दिला!

### महायुतीच्या पत्रकार परिषदेतून शिंदे, फडणवीस, अजित पवार यांची मविआवर टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले आहे. राज्यात पुन्हा एकदा महायुतीची सत्ता येणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानले आहेत. यावेळी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि अजित पवार यांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल करताना, महाराष्ट्राच्या जनतेसमोर आम्ही नतमस्तक होत असून हा विजय जबाबदारी वाढवणारा असल्याचे म्हटले आहे. गेल्या सव्वा दोन वर्षात आम्ही जे काम केले, जे निर्णय घेतले,

◀◀ पान २ वर

**परळीत फक्त डीएम बॉस, आष्टीत सुरेश धस, गेवराईत विजयपर्व, बीडमध्ये संदिप भैय्याच, माजलगावात पुन्हा प्रकाशदादा, केजमध्ये दुसऱ्यांदा मुंदडा**

# शिक्कामोर्तब: मुंडेंचाच बीड जिल्हा!

## सहा पैकी ५ मतदार संघात महायुतीचे आमदार








**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निकालानंतर विधानसभेला सुध्दा जरांगे फॅक्टरमुळे मुंडे कुटुंबाचे वर्चस्व संपेल, असे वाटत असताना ६ पैकी पाच मतदार संघात महायुतीचे आमदार झाल्याने मुंडे बहिण -भावाचाच बीड जिल्हा असल्यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. परळीत धनंजय मुंडे यांचा शानदार विजय, तर आष्टीत सुरेश धस, गेवराईत विजयपर्व, बीडमध्ये संदिप भैय्याच, माजलगावात पुन्हा प्रकाशदादांचा वादा आणि केजमध्ये दुसऱ्यांना नमिता मुंदडा या आमदार झाल्या आहेत.**



बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघावर आपले वर्चस्व मिळवण्यासाठी शरद पवार आणि मुंडे बहिण -भावा यांच्याकडून लोकसभा निकालानंतर जोरदार व्युव्हरचना करण्यात आली. नेते आणि कार्यकर्ते यांची फोडाफोडी पण करण्यात आली. लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव केल्याने शरद पवार गटाचा आत्मविश्वास दुणावला होता. परळीमध्ये धनंजय मुंडे यांना शह देण्यासाठी पवारांनी सुरुवातीपासूनच प्रयत्न केले. मात्र त्यांना त्यात यश आले नाही. उलट उमेदवार देण्यातच पवार चुकले. परळीतून धनंजय मुंडे हे रेकॉर्ड ब्रेक मताधिक्याने विजयी झाले. आष्टीत भाजपचे उमेदवार सुरेश धस यांनी अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे आणि शरद पवार गटाचे उमेदवार शेख महेबुब, अजित पवार गटाचे बाळासाहेब आजबे यांचा अर्ध शतकी मताधिक्याने पराभव केला.

गेवराईत माजी मंत्री व उबाठा शिवसेनेचे उमेदवार बदामराव पंडीत यांचा महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडीत यांनी पराभव केला. विजयसिंह पंडीत यांनी सुरुवातीपासून आघाडी घेतली होती.

◀◀ पान २ वर

**परळी मतदार संघ**

धनंजय मुंडे-१ लाख ९४ हजार ८८९ मते (मताधिक्य-१,४०,५०७)
राजेसाहेब देशमुख (शरद पवार गट)-५४ हजार ६६५ मते
धनंजय मुंडे विजयी-१ लाख ४० हजार २२४ मताधिक्य

**आष्टी मतदारसंघ**

सुरेश धस (भाजप)-१लाख ४० हजार ५०७ मते (मताधिक्य-७७,९७५)
भीमराव धोंडे (अपक्ष)-६२,५३२
शेख महेबुब (शरद पवार गट)-५२,७३८
बाळासाहेब आजबे (अजित पवार गट)-२१,५९८

**बीड मतदार संघ**

संदिप क्षीरसागर (मविआ) १,०१,८७४ (मताधिक्य-५३२४)
योगेश क्षीरसागर (महायुती)-९६,५५०
अनिल जगताप (अपक्ष)-१५,६१३
ज्योतीताई मेटे (अपक्ष)-९७६८
कुंडलिक खांडे -३३५९
पुरुषोत्तम वीर (वंचित)-३२४७
भागवत तावरे -१३९८

**गेवराई मतदार संघ**

विजयसिंह पंडीत (महायुती)-१,१६,१४१ (मताधिक्य-४२,३९०)
बदामराव पंडीत (उबाठा सेना)-७३,७५१
लक्ष्मण पवार -३८१७१
प्रियंका खेडकर (वंचित)-३१,२२३

**माजलगाव मतदार संघ**

प्रकाश सोळंके (महायुती)६६००९ (मताधिक्य- ५८९९)
मोहन जगताप (मविआ) ६०११०
रमेश आडसकर (अपक्ष) ३८९८१
माधव निर्मळ (अपक्ष) ३४७६७
बाबरी मुंडे (अपक्ष) १८०५९
शेख मंजुर (वंचित) ५३२७

## माझा विजय स्वाभिमानी मतदारांना समर्पित-आ.विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

कार्यकर्त्यांचे परिश्रम, आदरणीय भैय्यासाहेब यांचे परफेक्ट नियोजन आणि मतदारांचा विश्वास यामुळे विजय मिळाला. आजचा विजय गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम स्वाभिमानी मतदारांना समर्पित करत आहे अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केली. या विजया मुळे आजवरचे सर्व राजकीय हिशोब चुकते केले आहेत. आदरणीय शिवाजीराव दादांचे स्वप्न साकारले आहे.



मोठी जबाबदारी मतदारांनी दिली आहे ती सार्थ करण्याचा नक्की प्रयत्न करणार असल्याचे भावना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केली. गेवराई विधानसभा मतदारसंघातून विजयसिंह पंडित यांचा मोठा विजय झाल्यानंतर ते बोलत होते. गढी पासुन ते गेवराई शहरात भव्य मिरवणूक काढून कार्यकर्त्यांनी हा आनंद साजरा केला. विजयसिंह पंडित यांनी मतदारांसह

◀◀ पान २ वर

# विकासाचा अनुशेष भरण्यासाठी आ.सुरेश धसांना मंत्रीपद हवेच!

## देवेंद्र फडणवीसांकडे बीडचे भुमिपुत्र परमेश्वर येवलेंनी शब्द टाकल्यास शक्य

**बीड प्रतिनिधी**

**गेल्या काही वर्षापासून आष्टी, पाटोदा आणि शिरुर मतदार संघात विकासाचा मोठा अनुशेष शिल्लक असून तो भरुन काढायचा असेल तर आ. सुरेश धस यांना महायुतीच्या मंत्रिमंडळात सहभागी करुन घेण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. धसांना मंत्रीपद द्यावे, यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बीडचे भुमीपुत्र व फडणवीस यांचे निकटवर्तीय परमेश्वर नाना येवले यांनी शब्द टाकावा, अशी आता मागणी होऊ लागली आहे.**

आष्टी मतदार संघाचे प्रतिनिधित्व सुरेश धस यांनी बऱ्याच वेळा केले असून मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास कामे सुध्दा त्यांनी केली आहेत. गेल्या काही वर्षात ते या मतदार संघाचे आमदार नसल्याने विकासाचा अनुशेष मोठा असून तो भरुन काढण्यासाठी त्यांना मंत्रीपद देणे गरजेचे असल्याचे म्हटले जात आहे. आष्टीचे भुमिपुत्र व उद्योजक परमेश्वर

◀◀ पान २ वर











cmyk

## अग्रलेख

# सहा महिन्यातच जनतेचा मूड बदलला

महाराष्ट्रातील विधानसभा २०२४ च्या निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले आहेत. राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट बहूमत दिले आहे. महायुतीचे २०० पेक्षा अधिक उमेदवार विजयी झाले आहेत. तर दुसऱ्या बाजूला मविआला ५० जागाही मिळालेल्या नाहीत. महायुतीच्या झालेल्या या एकतर्फी विजयामुळे राजकीय विश्लेषकांकडूनही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याच महायुतीचा अवघ्या ६ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत डब्बा गूल झाला होता. तर मविआचे सर्वाधिक उमेदवार विजयी झाले होते. मात्र फक्त ६ महिन्यात असे काय झाले? ज्यामुळे मतदारांनी त्यांचा निर्णय बदलत महायुतीला साथ दिली, याचे परिक्षण आणि आत्मनिरीक्षणही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी करण्याची आता गरज आहे.

महाराष्ट्रात अनेक टप्प्यांमध्ये लोकसभेचे मतदान झाले. महाराष्ट्रात एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. अर्थात महाराष्ट्रातून देशाच्या संसदेत ४८ खासदार निवडून जातात. या लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये ४८ पैकी मविआच्या ३१ उमेदवारांचा विजय झाला होता. तर विधानसभा मतदारसंघनिहाय पाहायचे झाले तर मविआ १५१ जागांवर आघाडीवर होती. मात्र ६ महिन्यांमध्येच जनमत बदलल्याचे दिसत आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीत जो पक्ष जिंकतो, त्यांचेच सरकार बनवण्यात मतदार गेल्या २० वर्षांपासून निर्णायक भूमिका बजावत आला आहे. मात्र २०२४ मध्ये अनेक उलटफेर पाहायला मिळाले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या पदरी निराशा पडली. मात्र त्यानंतरही भाजपने विविध पक्षांना सोबत घेत सरकार स्थापन केले. त्याचाच परिणाम हा मतदारांवर झाला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एकनाथ शिंदे यांना का हटवावे? हे सांगण्यात आणि पटवून देण्यात विरोधक अपयशी ठरले. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत पक्ष फोडला, असे आरोप करत विरोधकांनी हल्लाबोल केला खरा, मात्र विरोधकांचा हा मुद्दा मतदारांना त्यांच्याकडे ओढू शकला नाही, हेच विधानसभेच्या निकालावरुन स्पष्ट होत आहे. मविआमध्ये जागावाटपावरुनही अनेक वाद पाहायला मिळाले. जागावाटपावरुन काँग्रेसचे नाना पटोले आणि ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यातही टोकाचा वाद पेटला होता. आघाडीतील हा बेबनाव जनता पाहत होती. नंतर त्यांनी कितीही सावरण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्यातील मतभेद हे कोणत्या ना कोणत्या कारणावरून बाहेर येत होतेच. याशिवाय मुख्यमंत्रीपदाची चर्चाही विनाकारण वाढविण्यात आली. एखाद्या मुद्यावर लोक हसत असतील तर तो विषय लगेच थांबविण्याची गरज असते मात्र महाविकास आघाडीतील नेते अनेक विषय चघळत बसले. दुसरीकडे राज्यातील सत्तेचा मार्ग हा विदर्भातून जातो, असे म्हटले जाते. मात्र काँग्रेस विदर्भात सपशेल अपयशी ठरली आहे. काँग्रेसचे विदर्भातील मातब्बर नेत्यांचा पराभव झाला आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यासमोर जातीच्या राजकारणाराचा काहीच फरक निकालातून दिसला नाही. जनतेने जातीऐवजी धर्माला प्राधान्य दिल्याचेही या निकालातून अधोरिखत झाले आहे.

निकालाकडे पाहता आणखी एक मुद्दा जो कळीचा ठरला तो म्हणजे लाडकी बहिण आणि त्याबाबतची जागृती शिवाय या योजनेचे भविष्य यासाठी महायुतीच्या नेत्यांकडून दिलेले आश्वासन याचा मोठा फरक पडल्याचे स्पष्ट दिसत आहे. एकनाथ शिंदे सरकारने राज्यातील महिलांना अचूक हेरले. लाडकी बहिण योजनेअंतर्गत दरमहिना दीड हजार रुपये दिले. तर जिंकून आल्यानंतर दर महिन्याला २ हजार १०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. कदाचीत यामुळेच राज्यातील मतदानाचा टक्का वाढला असल्याची चर्चा समोर येत आहे. या वाढीव मतदानाचा फायदा हा महायुतीलाच झाला हे आता स्पष्ट झाले आहे. महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यात लाडक्या बहिणींनी गेमचेंजिंग भूमिका बजावली, हे धुतलेल्या तांदळासारखे स्वच्छ आहे. आता कोणी याला लिगल लाच म्हणत असले तरी त्याला काही अर्थ नाही.

## असे आहेत राज्यातील विजयी झालेले काही उमेदवार....

| क्र. | मतदारसंघ | महाविकासआघाडी | महायुती |
|---|---|---|---|
| १ | अक्कलकुवा | के. सी. पाडवी (काँग्रेस) | आमश्या पाडवी (शिवसेना) विजयी |
| २ | शहादा | राजेंद्रकुमार गावीत (काँग्रेस) | राजेश पाडवी (भाजप) विजयी |
| ३ | नंदुरबार | किरण तडवी (काँग्रेस) | विजयकुमार गावीत (भाजप) विजयी |
| ४ | नवापुर | शिरीषकुमार नाईक (काँग्रेस) विजयी | भरत गवित (राष्ट्रवादी काँग्रेस) |
| ५ | साक्री | प्रवीण चौरे (काँग्रेस) | श्रीमती मंजुळा गावीत (शिवसेना) विजयी |
| ६ | धुळे ग्रामीण | कुणाल पाटील (काँग्रेस) | राघवेंद्र पाटील(भाजप) विजयी |
| ७ | धुळे शहर | अनिल गोटे (शिवसेना- यूबीटी) | अनुप अग्रवाल (भाजप) विजयी |
| ८ | सिंदखेडा | संदीप बेंडसे (राष्ट्रवादी एसपी) | जयकुमार रावल (भाजप) विजयी |
| ९ | शिरपूर | बुधामल पावरा (भाकप) | काशीराम पावरा (भाजप) विजयी |
| १० | चोपडा | राजू तडवी (शिवसेना- यूबीटी) | चंद्रकांत सोनावणे (शिवसेना) विजयी |
| ११ | रावेर | धनंजय चौधरी (काँग्रेस) | अमोल जावळे (भाजप) विजयी |
| १२ | भुसावळ | डॉ. राजेश माणवतकर (काँग्रेस) | संजय सावकारे (भाजप) विजयी |
| १३ | जळगाव शहर | जयश्री महाजन (शिवसेना- यूबीटी) | सुरेश भोळे (भाजप) विजयी |
| १४ | जळगाव ग्रामीण | गुलाबराव देवकर (राष्ट्रवादी एसपी) | गुलाबराव पाटील (शिवसेना) विजयी |
| १५ | अमळनेर | डॉ. अनिल शिंदे (काँग्रेस) | अनिल पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) विजयी |
| १६ | एरंडोल | सतीश पाटील (राष्ट्रवादी एसपी) | अमोल पाटील (शिवसेना) विजयी |
| १७ | चाळीसगाव | उन्मेष पाटील (शिवसेना- यूबीटी) | मंगेश चव्हाण (भाजप) विजयी |
| १८ | पाचोरा | वैशाली सूर्यवंशी (शिवसेना- यूबीटी) | किशोर पाटील (शिवसेना) विजयी |
| १९ | जामनेर | दिलीप खोडपे (राष्ट्रवादी एसपी) | गिरीश महाजन (भाजप) विजयी |
| २० | मुक्ताईनगर | रोहिणी खडसे (राष्ट्रवादी एसपी) | चंद्रकांत पाटील (शिवसेना) विजयी |
| २१ | मलकापुर | राजेश एडके (काँग्रेस) | चैनसुख संचेती (भाजप) विजयी |
| २२ | बुलडाणा | जयश्री शेळके (शिवसेना- यूबीटी) | संजय गायकवाड (शिवसेना) विजयी |
| २३ | चिखली | राहुल बोंद्रे (काँग्रेस) | श्वेता महाले (भाजप) विजयी |
| २४ | सिंदखेडराजा | डॉ. राजेंद्र शिंगणे (राष्ट्रवादी -एसपी) | मनोज कायंदे (राष्ट्रवादी काँग्रेस) विजयी |
| २५ | मेहकर | सिद्धार्थ खरात (शिवसेना- यूबीटी) विजयी | डॉ. संजय रायमुलकर (शिवसेना) |
| २६ | खामगाव | दिलीपकुमार सानंदा (काँग्रेस) | आकाश फुंडकर (भाजप) विजयी |
| २७ | जळगाव (जामोद) | डॉ. स्वाती वाकेकर (काँग्रेस) | डॉ.संजय कुटे (भाजप) विजयी |
| २८ | अकोट | महेश गंगणे (काँग्रेस) | प्रकाश भारसाकळे (भाजप) विजयी |
| २९ | बाळापूर | नितीन देशमुख (शिवसेना- यूबीटी) विजयी | बळिराम शिरसकर (शिवसेना) |
| ३० | रामटेक | विशाल बरबटे (शिवसेना- यूबीटी) | आशीष जैस्वाल (शिवसेना) विजयी |
| ३१ | अकोला पूर्व | गोपाल दातकर (शिवसेना- यूबीटी) | रणधीर सावरकर (भाजप) विजयी |
| ३२ | मूर्तिझापूर | सम्राट डोंगरदिवे (राष्ट्रवादी एसपी) | हरिश पिंपळे (भाजप) विजयी |
| ३३ | रिसोड | अमित झनक (काँग्रेस) विजयी | भावना गवळी (शिवसेना) |
| ३४ | वाशिम | डॉ. सिद्धार्थ देवळे (शिवसेना- यूबीटी) | श्याम खोडे (भाजप) विजयी |
| ३५ | कारंजा | ज्ञायक पटनी (राष्ट्रवादी एसपी) | सई डहाके (भाजप) विजयी |
| ३६ | धामणगाव रेल्वे | वीरेन्द्र जगताप (काँग्रेस) | प्रताप अडसड (भाजप) विजयी |
| ३७ | बडनेरा | सुनील खराटे (शिवसेना- यूबीटी) | रवी राणा (महायुती पुरस्कृत) विजयी |
| ३८ | अमरावती | डॉ. सुनील देशमुख (काँग्रेस) | सुलभा खोडके (राष्ट्रवादी काँग्रेस) विजयी |
| ३९ | तिवसा | यशोमती ठाकूर (काँग्रेस) | राजेश वानखेडे (भाजप) विजयी |
| ४० | दर्यापूर | गजानन लवटे (शिवसेना यूबीटी) विजयी | अभिजीत अडसूळ (शिवसेना) |
| ४१ | मेळघाट | डॉ. हेमंत चिमोटे (काँग्रेस) | केवलराम काळे (भाजप) विजयी |
| ४२ | अचलपूर | बबलूभाऊ देशमुख (काँग्रेस) | प्रवीण तायडे (भाजप) विजयी |
| ४३ | मोर्शी | गिरीश कराळे (राष्ट्रवादी एसपी) | उमेश यावलकर (भाजप) विजयी |
| ४४ | आर्वी | मयूरा काळे (राष्ट्रवादी एसपी) | सुमित वानखेडे (भाजप) विजयी |
| ४५ | भंडारा | श्रीमती पूजा ठावकर (काँग्रेस) | नरेंद्र भोंडेकर (शिवसेना) |
| ४६ | हिंघणघाट | अतुल वांदिले (राष्ट्रवादी एसपी) | समीर कुणावार (भाजप) विजयी |
| ४७ | साकोली | नानाभाऊ पटोले (काँग्रेस) विजयी | अविनाश ब्राह्मणकर (भाजप) |
| ४८ | तिरोरा | रविकांत बोपचे (राष्ट्रवादी एसपी) | विजय रहांगडाले (भाजप)विजयी |
| ४९ | गोंदिया | गोपालदास अग्रवाल (काँग्रेस) | विनोद अग्रवाल (भाजप) विजयी |
| ५० | हिंगणा | रमेश बंग (राष्ट्रवादी एसपी) | समीर मेघे (भाजप) विजयी |
| ५१ | उमरेड | संजय मेश्राम (काँग्रेस) विजयी | सुधीर पारवे (भाजप) |

# झारखंडच्या जनतेचा पुन्हा झामुमो–काँग्रेसच्या आघाडीला कौल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**झारखंड विधानसभेच्या ८१ जागांचा निकाल शनिवारी जाहीर झाला. पुन्हा एकदा झारखंडच्या जनतेने झारखंड मुक्ती मोर्चा (झामुमो) आणि काँग्रेसच्या आघाडीला कौल दिला आहे. ८१ पैकी ५६ जागा इंडिया आघाडी तर २४ जागा एनडीएच्या उमेदवारांचा विजय झाला आहे. झारखंडमध्ये बहुमतासाठी ४२ जागा जिंकणे आवश्यक आहे. त्यामुळे झारखंडमध्ये इंडिया आघाडी सत्ता स्थापनेचा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

इंडिया आघाडीत मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या झामुमोला सर्वात जास्त ३४ जागांवर विजय मिळाला असून, काँग्रेस १६, राष्ट्रीय जनता दल (राजद) ४, सीपीआयएमएल २ जागेवर विजय झाले आहेत. एनडीएमध्ये भाजपला २१, जदयू १, अजसयू पक्षाला १ आणि लोजपाला १ जागेवर विजय मिळाला आहे. या निवडणुकीत मुख्यमंत्री हेमंत सोरेन बरहेट मतदारसंघातून, त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन गांडेयमधून, भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी धनवाडमधून, भाजप नेते चंपई सोरेन सेराईकेला मतदारसंघातून विजयी झाले आहेत. भाजप नेत्या सीता सोरेन यांचा जामतारा मतदारसंघातून पराभव झाला असून काँग्रेसचे इरफान अन्सारी विजयी झाले आहेत. तर डुमरी मतदारसंघातून झामुमोच्या बेबी देवी यांना पराभवाचा सामना करावा लागला. तिथे झालोक्रांमोचे जयराम महातो विजयी झाले आहेत. हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्री होणार इंडिया आघाडी हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वात झारखंडमध्ये निवडणूक लढली आहे. ते विद्यमान मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे पुन्हा राज्याचे नेतृत्व त्यांच्याकडेच जाणार आहे. तसेच त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन यांची लोकप्रियता प्रचंड वाढलेली पाहायला मिळाली. हेमंत सोरेन तुरुंगात गेल्यावर लोकसभा निवडणुकीत आणि त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीत कल्पना सोरेन यांनी जोरदार प्रचार केला. इंडिया आघाडीच्या विजयानंतर हेमंत सोरेन बोलताना म्हणाले की, कल्पना सोरेन 'वन मॅन आर्मी' आहेत. त्यामुळे कल्पना सोरेन यांना मुख्यमंत्री केले जाते की काय ? अशीही चर्चा आहे.

# गुंधा येथे विजयसिंह पंडित यांच्या विजयाचा जल्लोष

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई मतदार संघातून विजेचा पंडित हे निवडून आले आहेत. त्यांच्या या विजयाचा जल्लोष बीड तालुक्यातील गुंधा येथे फटाके फोडून आणि पेढे वाटून साजरा करण्यात आला. यावेळी गुंधा गावचे सरपंच नंदकिशोर मोरे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**



राज्याच्या विधानसभेचा निकाल शनिवारी जाहीर झाला यामध्ये गेवराई मतदार संघातून विजयसिंह पंडित हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले. विजयसिंह पंडित हे पहिल्यांदाच आमदार झाल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांकडून मोठा जल्लोष करण्यात येत आहे. बीड तालुक्यातील गुंधा येथे विजयसिंह पंडित यांच्या विजयाचा जल्लोष मोठ्या उत्साहात करण्यात आला. गावचे सरपंच नंदकिशोर मोरे, नितीन मोरे, गोविंद मोरे, राहुल मोरे, चेतन मोरे, रोहित मोरे, शुभम मोरे, किरण लांडगे, योगेश जाधव, अमोल उबाळे आदी तरुणांनी गुलाल उधळीत, पेढे वाटून आणि फटाके फोडत विजयाच्या घोषणा दिल्या. विजयसिंह पंडित निवडून यावेत यासाठी सरपंच नंदकिशोर मोरे यांनी या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले. त्यांच्या या परिश्रमाला यश आले असून परिसरातून विजयसिंह पंडित यांना चांगले मताधिक्य मिळाले आहे.

# पंकजा मुंडेंमुळे भाजपला मराठवाड्यात चांगले दिवस

## ओबीसींची साथ: ४६ जागांपैकी भाजपने पटकावल्या १९ जागा

**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत भाजपसह महायुतीला मराठवाड्यात सपाटून मार खावा लागला होता. विधानसभेतही त्याची पुनर्रावृत्ती होते की काय असे वाटत असताना विखुरलेल्या ओबीसींची मोट बांधत भाजपच्या बाजुने केल्यामुळे मराठवाड्यात ४६ पैकी १९ जागा भाजपला तर महायुतीला ३६ जागा मिळाल्या आहेत. खऱ्या अर्थाने पंकजा मुंडे यांच्यामुळे भाजपला मराठवाड्यात चांगले दिवस आले असल्याचे दिसून येत आहे.**

मराठवाडा हा स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या काळापासून भाजपचा गड राहीला असून लोकसभा निवडणुकीसह विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकीतही मराठवाड्याने भाजपला साथ दिली आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टरमुळे महायुतीचा मराठवाड्यात दारुण पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभा निवडणुकीतही जरांगे फॅक्टरची जादू दिसून येईल, असे वाटत होते. मात्र मराठवाड्यात ४६ पैकी भाजपने १९ विधानसभा मतदार



संघात विजय मिळवला असून या मतदार संघातील ओबीसींची ताकद पंकजा मुंडे यांनी भाजपच्या बाजूने उभी केली होती. त्यामुळेच की काय भाजपला मराठवाडयात पुन्हा चांगले दिवस आले आहे. महायुतीला ४६ पैकी ३६ जागा मिळाल्या असून मविआला मात्र केवळ ८ जागांवर विजय मिळवता आला आहे. बीड जिल्ह्यात सुध्दा भाजपने २ जागा मिळवल्या असून लातूर, धाराशिव, नांदेड, जालना आणि परभणी जिल्ह्यात महायुतीला चांगले यश मिळाले असून पंकजा मुंडे याच खऱ्या अर्थाने किंगमेकर ठरल्या असल्याचे बोलले जात आहे.

## पान १ वरून...

### महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक

ते निर्णय न भूतो न भविष्यातील होते. महाविकास आघाडीने बंद पाडलेली कामे आम्ही सुरू केल्याचे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मविआवर टिका केली. राज्याने आतापर्यंत अनेक निवडणुका पाहिल्या पण ही निवडणूक ऐतिहासिक ठरली. लोकांनी महायुतीवर प्रेमाचा वर्षावर केला. लाडकी बहीण, लाडका भाऊ आणि शेकऱ्यांनी भरभरून प्रेम दिले. मतदान केले. यामुळे त्यांचे आभार मानत असल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी, महाराष्ट्राच्या जनतेसमोर आम्ही नतमस्तक होत असून हा विजय आमची जबाबदारी वाढवणारा असल्याचे म्हटले आहे. तर आता आम्हाला महाराष्ट्रात खूप काम करावे लागणार असून राज्यातील जनतेचा विश्वासाला तडा जावू देणार नाही, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. राजकारणात आल्यापासून पहिल्यांदाच असे यश मिळाले असून यामुळे आम्ही हुरळुन जाणार नाही. आमच्यावर जनतेने टाकलेला विश्वास मोठा असून त्याला तडा जाऊ देणार नाही, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी विरोधकांवर टीका करताना, बॅलेट पेपरची आता मागणी करणाऱ्या विरोधकांनी लोकसभेला देखील अशी मागणी करायला हवी होती असा टोला लगावला आहे. लाडकी बहीण गेमचेंजर ठरली असून आम्हाला आणखी काम करायचे आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक शिस्त आणावी लागेल. आमच्या पाठिशी केंद्र सरकार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

**महाराष्ट्राने मतदान केले की ईव्हीएमने – आदित्य ठाकरे**

आमदार म्हणून निवडून आल्यानंतर आदित्य ठाकरेंनी विधानसभा निवडणुक निकालांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आम्हाला ऑनग्राऊंड जो निकाल वाटत होता तो दिसला नाही. महाराष्ट्राने मतदान केले आहे की, ईव्हीएमने केले आहे? लोकसभेत याच महाराष्ट्राने आम्हाला आशिर्वाद दिला, मात्र या निकालावर विचार, चर्चा होईल. पण आता तो निकाल लागला आहे, तो मान्य करुनच पुढे जावे लागेल.

**निकालामध्ये गडबड आहे – संजय राऊत**

निकालामध्ये गडबड आहे, पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर झालेला आहे. एकनाथ शिंदे सर्व आमदार कसे काय निवडून आणू शकतात. ज्यांच्या गद्दारीवर महाराष्ट्रात रोष आहे, अजित पवारांच्या बेईमानीविरुद्ध महाराष्ट्रात प्रचंड रोष आहे. शरद पवारांच्या सभांना तुफान प्रतिसाद मिळत होता, हे वादळ तुम्हाला दिसत नाही. पण, आज जागा जिंकल्यावरती युतीचे वादळ, युतीचे वादळं म्हणत आहात. आता, मीडियानेच स्वत:ला हा प्रश्न विचारावा, गडबड आहे की नाही?, अशा शब्दात संजय राऊत यांनी आलेल्या निकालवरुन तीव्र संताप व्यक्त केला आहे.

----------

### शेतकऱ्यांच्या नाराजीचा

एकदा कांदापट्ट्यात पाहायला मिळेल असे सांगितले जात होते. परंतु महायुतीने कांदापट्ट्यातही वर्चस्व निर्माण केले. तर ऊसपट्ट्यात महायुतीने जोरदार मुसंडी मारली आहे. दूध उत्पादकांची नाराजीही या निवडणुकीत मतपेटीतून उमटली नाही. त्यामुळे या निवडणुकीत शेतकऱ्यांची नाराजी मतपेटीत दिसेल, हा अंदाज फोल ठरला. महायुती सरकारच्या शेती धोरणांबद्दल शेतकरी नाराज होते. सोयाबीन कापसाचे पडलेल्या दराचा फटका महायुतीला बसेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. तर कांदा, दूध आणि ऊस उत्पादक शेतकरी पुन्हा राजकीय ताकद दाखवून देतील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. परंतु महायुतीच्या व्यूहरचनेसमोर सगळे काही फोल ठरले. या निवडणुकीत मात्र महाविकास आघाडीच्या अजेंडावर महायुतीच्या नरेटीव्हला काऊंटर करणे, एवढा एकच कार्यक्रम होता. महायुती महाविकास आघाडीचे जाहीरनामे पाहिल्यावर लक्षात येते. त्यामुळे त्याचा झटकाही महाविकास आघाडीला बसला असण्याची शक्यता आहे. दुसरीकडे महायुतीने लोकसभा निकालानंतर शेतकऱ्यांमधील नाराजी ओळखून सोयाबीन कापूस अनुदान, मोफत वीज यासारख्या योजना राबवण्याचा सपाटा लावला होता. शेतकऱ्यांमध्ये नाराजी नाहीच किंवा शेतकरी सुखी आहे, असा या निकालाचा अर्थ होत नाही. केवळ शेतकऱ्यांची राजकीय ताकद मतपेटीत दिसली नाही, एवढाच त्याचा अर्थ. आणि ते अपयश अर्थात विरोधकांचे आहे. शेतकऱ्यांमधील नाराजी विरोधकांना मतात परावर्तीत करता आली नाही. तर दुसरीकडे आता महायुतीची खरी परीक्षा सुरू होणार आहे. कारण मतांच्या जोगव्यासाठी भावांतर योजना, सोयाबीनला ६ हजार रुपये दर, कृषी पंपांना मोफत वीज, नमो शेतकरी सन्मान निधीत वाढ, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, लाडकी बहिणीसाठी वाढीव निधी अशा एक नाही तर खंडीभर आश्वासनाची उधळण महायुतीनं केली आहे. त्याचं आर्थिक नियोजन कसं करणार हाच खरा प्रश्न आहे.

-------

### शिक्कामोर्तब: मुंडेंचाच

वंचितच्या प्रियंका खेडकर या केवळ एका फेरीत आघाडीवर होत्या. शेवटी विजयसिंह पंडीत यांनीच ४२ हजार ३९० मताधिक्य घेत बाजी मारली. माजलगावात शेवटपर्यंत अटीतटीचा सामना झाला. महायुतीचे प्रकाश सोळंके हे पहिल्या दोन फेरीपर्यंत आघाडीवर होते, त्यानंतर मविआचे मोहन जगताप हे १५ व्या फेरीपर्यंत आघाडीवर राहिले. १६ वी फेरी ही वडवणी तालुक्यातील सुरु होताच प्रकाश सोळंके हे किरकोळ मतांनी आघाडीवर गेले. त्यानंतर सोळंके यांची आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. शेवटच्या फेरीत प्रकाश सोळंके यांनी जगताप यांचा ५ हजाराच्या पुढील मताधिक्याने पराभव केला. बीड मतदार संघाचा निकाल रोमांचकारी राहीला. सुरुवातीच्या काही फेरीमध्ये महायुतीचे योगेश क्षीरसागर हे आघाडीवर होते. त्यानंतर मविआचे संदिप क्षीरसागर यांची आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. संदिप क्षीरसागर यांना मराठा आणि मुस्लिम मतांनी तारले असून सख्या भाऊ, चुलत भाऊ आणि काका जयदत्त क्षीरसागर हे विरोधात जावून सुध्दा संदिप यांनी बीडचे मैदान मारले आहे. केज मतदार संघात सुरुवातीपासून मविआचे पृथ्वीराज साठे यांची हवा होती. महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांची राजकिशोर मोदी, माजी आ. संगिता ठोंबरे यांनी साथ सोडली तरीही सुध्दा मुंदडा या केजमधून दुसऱ्यांदा आमदार झाल्या आहेत. एकंदरीत लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर बीड जिल्ह्यातील मुंडे कुटुंबाचे वर्चस्व संपून जाईल. जरांगे फॅक्टरचे वर्चस्व सिध्द होईल, अशी चर्चा होती. मात्र बीड जिल्हा हा मुंडे कुटुंबाचाच आहे, यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले.

-----------

### विकासाचा अनुशेष भरण्यासाठी

नाना येवले यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शब्द टाकला तर धसांना सहज मंत्रीपद मिळू शकते असे म्हटले जात असून येवले यांनी त्यासाठी फडणवीसांकडे शब्द टाकावा, अशी आता मतदार संघातून मागणी होऊ लागली आहे.

----------

### माझा विजय स्वाभिमानी मतदारांना

नेत्यांचे आभार व्यक्त केले. गेवराई विधानसभा मतदारसंघा साठी झालेल्या मतमोजणी साठी प्रारंभी पासूनच विजयसिंह पंडित यांनी मोठी आघाडी घेतली होती, ती शेवटपर्यंत कायम ठेवली आणि प्रत्येक फेरी अखेर ती वाढतच गेली. विजयसिंह पंडित यांना एकूण १,१६,१५१ मते मिळाली असून त्यांनी ४२,३९० मतांनी विजय मिळवला. मतमोजणी दरम्यान कार्यकर्ते आणि मतदार यांनी मोठा जल्लोष केला. गढी येथील मतमोजणी केंद्रापासून पासुन नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गेवराई शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद साजरा केला. नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी हा विजय स्वाभिमानी मतदारांना समर्पित केला आहे. कायम जनतेच्या सेवेत राहणार असल्याचे त्यांनी सांगून या निवडणूकीत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

**प्रमाणपत्र बहाल**

यावेळी निवडणूक निरीक्षक लालटनपुई वाँगचाँग, निवडणूक निर्णय अधिकारी सतिश धुमाळ, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार संदिप खोमणे यांच्या हस्ते विजयसिंह पंडित यांना निवडणूकीत विजयी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी निवडणूक निरिक्षक तथा संपर्क अधिकारी ज्ञानोबा मोकाटे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम मांडूरके यांच्या सह निवडणूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व निवडणुक कर्मचारी आणि अधिकारी यांचे आ. विजयसिंह पंडित यांनी आभार मानले. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, माझ्या विजयामध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, ना. धनंजय मुंडे, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजा मुंडे यांच्यासह मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा आणि मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि मतदार बंधू भगिनींचा मोठा वाटा आहे. मला तुम्ही भरभरून आशीर्वाद दिला मतदारसंघांमध्ये माझ्या विरोधात खूप मोठ्या प्रमाणावर अपप्रचार झाला, जात पात धर्म यामध्ये मला अडकवण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु मायबाप मतदारांनी जात पात धर्म या पलीकडे जाऊन मला आशीर्वाद दिले. कार्यकर्त्यांनी आपणच उमेदवार आहोत या भावनेतून काम केल्यामुळे मी हा विजय मिळवू शकलो. शिवछत्र परिवार जात पात धर्म यापलीकडे जाऊन काम करतो हे तुम्ही या निमित्ताने दाखवून दिले आहे. यापुढील काळात आपण सकारात्मक काम करुन मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे सांगून गेवराई विधानसभा मतदारसंघातीलया सर्व समाजातील मतदार बांधवांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याला मी तडा जाऊ देणार नाही. येणाऱ्या पाच वर्षांमध्ये मला मिळालेल्या संधीचे मी सोने करेल असेही आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले

**यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम मतदार बंधू–भगिनींनी विजयवर**

विश्वास टाकला त्याबद्दल त्यांचे मी जाहीर आभार मानतो. आ. विजयसिंह पंडित यांचा हा विजय ऐतिहासिक आहे या विजयामुळे मला मनस्वी आनंद होतो आहे. आज १९९५ च्या निवडणुकीची मला आठवण झाली. आज या निमित्ताने सगळे हिशोब चुकते झाले. निवडणुकीच्या निमित्ताने दिलेला शब्द पूर्ण करण्याचा विश्वास देतो. या ऐतिहासिक निकालामुळे शिवछत्र परिवाराच्या सातबारावर तुम्ही तुमचे नाव कोरले आहे, तेव्हा यापुढे विकासाची कामे तर होतीलच परंतु सामान्य माणसांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल असेही ते यावेळी म्हणाले.

**गढी ते गेवराई विजयी जल्लोष**

याप्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह कार्यकर्त्यांनी विजयी रॅली काढली. गढी ते गेवराई निघालेल्या या रॅलीमध्ये कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. विजयसिंह पंडित यांच्या विजयानंतर गेवराई आणि बीड येथील निवासस्थानी कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित जयभवानी कारखान्याचे संचालक जयसिंग पंडित यांनी मतदारांचे जाहीर आभार मानले.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २४ नोव्हेंबर २०२४


## तिंतरवणी परिसरात सुरेश धस यांच्या विजयाचा जल्लोष

**फुलसांगवी । प्रतिनिधी**

आष्टी -पाटोदा -शिरूर- विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाचे उमेदवार सुरेश धस यांचा ७५ हजार मतांनी दणदणीत विजय झाल्यामुळे तिंतरवणी परिसरामध्ये भाजप कार्यकर्त्याकडून तोफा फटाक्यांची आतिषबाजी करून, गुलालाची उधळण करत डीजे लावून आनंद उत्सव साजरा करण्यात आला आहे.

आष्टी - पाटोदा- शिरूर - विधानसभा मतदार संघात झालेल्या निवडणुकीत चौरंगी लढत झाली आहे आहे. यामध्ये महायुती, भाजपाचे उमेदवार सुरेश धस यांना मतदार संघातील मतदार बांधवांनी सुमारे ७५ हजारापेक्षा अधिक मताधिक्य देऊन विजयी केले आहे. सुरेश धस निवडून यावेत यासाठी तिंतरवणीचे सरपंच उद्धव बापू खेडकर यांच्याकडून मोठे प्रयत्न करण्यात आले होते. निकालाच्या दिवशी सुरेश धस हे विक्रमी मताने विजयी झाल्यामुळे सरपंच उद्धव बापू खेडकर यांच्यासह ग्रामपंचायत मधील उद्धव बापूंच्या कार्यकर्त्यांनी, तिंतरवणी परिसरातील सुरेश धस समर्थकांनी मोठा जल्लोष केला आहे. डीजे लावून गुलाल उधळला असून, मोठ्या प्रमाणात तोफा वाजवून फटाक्यांची आतिषबाजी करून हा आनंद उत्सव साजरा केला आहे.

# आ. पंकजाताई मुंडेंच्या झंझावती नेतृत्वाचा विधानसभा निवडणुकीत करिश्मा

## सभा घेतलेल्या २७ उमेदवारांपैकी महायुतीचे २३ उमेदवार मोठया मताधिक्याने विजयी

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा स्टार प्रचारक आ. पंकजाताई मुंडे यांच्या धडाकेबाज नेतृत्वाचा करिश्मा विधानसभा निवडणुकीतही दिसून आला हे आजच्या निकालावरून स्पष्ट झाले. त्यांनी प्रचार सभा घेतलेल्या २७ उमेदवारां पैकी २३ उमेदवार प्रचंड मतांनी झाले तर चार उमेदवारांचा निसटता पराभव झाला. दरम्यान, सर्व विजयी उमेदवारांचे आ. पंकजाताईंनी अभिनंदन केले आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजपच्या स्टार प्रचारक असलेल्या आ. पंकजाताई मुंडे यांनी स्वत:च्या बीड जिल्हयात उमेदवारांसाठी दोन दोन सभा तर घेतल्याच पण त्याच बरोबर राज्यातही ठिक ठिकाणी जोरदार प्रचार करून भाजपा महायुतीच्या उमेदवारांना बळ दिले. केवळ भाजपच्याच नाही तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांसाठी देखील त्यांनी प्रचार सभा घेतल्या. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत पंकजाताई मुंडे यांच्या खांद्यावर छोटीसी शस्त्रक्रिया झाली, तशा अवस्थेतही त्यांनी दुखणं सहन करत राज्यभर प्रचार केला. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा राजकीय वारसा लाभलेल्या आ. पंकजाताई मुंडे यांच्या कणखर व फायरब्रँड नेतृत्वाचा करिश्मा आजच्या निकालाने राज्यात पुन्हा एकदा दिसून आला.



**सभा घेतलेले २७ पैकी २३ उमेदवार विजयी**

आ. पंकजाताई मुंडे यांनी महायुतीच्या विजयासाठी कठोर मेहनत घेत ३५ हून अधिक सभा घेतल्या. काही ठिकाणी एकाहून अधिक सभा घेतल्या. त्यांनी सभा घेतलेल्या २७ मतदारसंघात २३ उमेदवार मोठया मताधिक्याने विजयी झाले आहेत. त्यात भाजपचे १८ व शिवसेनेचा एक आणि राष्ट्रवादीच्या ४ आमदारांचा समावेश आहे. बीड, मालेगाव वाशिम, सिंदखेडराजा, लोणार या ठिकाणी महायुतीला यश मिळू शकले नाही, त्यांनी सभा घेतलेल्या जागेवर महायुतीचे विजयी झालेले आमदार पुढीलप्रमाणे - सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर पुणे),

कुमार आयलानी (उल्हासनगर),

धनंजय मुंडे (परळी), नमिता मुंदडा (केज), विजयसिंह पंडीत (गेवराई), आकाश फुंडकर (खामगांव), सुरेश धस (आष्टी) मेघना बोर्डीकर (जिंतूर), दिलीप बनकर (निफाड), माधुरी मिसाळ (पुणे), श्रीजया चव्हाण (भोकर)

भीमराव केराम (किनवट),तानाजी मुटकुळे (हिंगोली),प्रकाश सोळंके (माजलगांव), प्रताप अडसड (धामणगांव), सुरेश खाडे (मिरज) सीमा हिरे (नाशिक), जयकुमार रावल (सिंदखेडा), हिकमत उढाण (घनसावंगी), मोनिका राजळे (पाथर्डी),सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट),महेश लांडगे (भोसरी), शिवाजीराव कर्डिले (राहुरी)

# कोकणात महायुतीची सरशी, ठाकरे गटाचा फक्त एका जागेवर विजय

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकासआघाडी अशी लढत झाली होती. अखेर या लढतीत महायुतीने महाविकासआघाडीचा सुपडा साफ केला आहे. महायुतीने तब्बल २२८ जागांवर आघाडी घेतली आहे. यात भाजप १३२ जागा, शिवसेना शिंदे गट ५५ आणि राष्ट्रवादी अजित पवार गट ४१ जागांवर आघाडीवर आहेत. तर महाविकासआघाडीला फक्त ४७ जागांवर समाधान मानावे लागले आहे. यात काँग्रेस १६ जागा, ठाकरे गट २१ आणि राष्ट्रवादी शरद पवार गट १० जागा मिळाल्या आहेत. तर अपक्ष-इतर यांना १३ जागा मिळाल्या आहेत.



महाराष्ट्रातील राजकारणात महत्त्वाचा विभाग मानला जाणार कोकणात कोण बाजी मारणार याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले असते. कोकण म्हणजे शिवसेनेचा बालेकिल्ला, कोकण म्हणजे नारायण राणे अशी वाक्य कायमच राज्याच्या राजकारणात पाहायला मिळतात. पण यंदाच्या विधानसभा निवडणुकीत कोकणातील जनता कोणाला साथ देणार याची चर्चा सर्वत्र पाहायला मिळत होती. अखेर कोकणातील जनतेने महायुतीच्या पारड्यात यश टाकलं आहे. कोकणातील १५ पैकी १४ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी ठरले आहेत. तर एका जागेवर ठाकरे गट विजयी झाला आहे.

**कोकणात महायुतीची सरशी, ठाकरे गट फक्त एका जागेवर विजयी**

कोकण हा कायमच शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र अडीच वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली होती. शिवसेनेचे सहा आमदार फुटून शिंदे गटात सामील झाले. यामुळे शिवसेनेत खूप मोठी फूट पडली. शिवसेनेची ताकद दोन गटांत विभागली गेली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अनेक विधानसभा मतदारसंघात शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना रंगला. कोकणातील १५ मतदारसंघांसाठी १२८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यातील ८ जागांवर शिंदे गट, ४ जागांवर भाजप आणि २ जागांवर अजित पवार गटाचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर फक्त एका जागांवर ठाकरे गटाचा विजय झाला आहे.

# घाटनांदुर येथे धनंजय मुंडे यांची भव्य विजयी रॅली काढून जल्लोष साजरा

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गट कडून परळी विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार धनंजय पंडितराव मुंडे साहेब हे उमेदवार होते धनंजय मुंडे साहेब हे १३८४८१ मते घेऊन महाराष्ट्रातून विक्रमी मताने विजय झाल्याबद्दल घाटनांदुर येथे २३ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहाने विजयी रॅली काढून गुलाल,भंडारा उधळून फटाके वाजून जल्लोष साजरा करण्यात



आला यावेळी घाटनांदुर नगरीचे सरपंच महेश आप्पा गारटे,भाजपा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष प्रदीप भैय्या वैद्य, ग्रा.प.सदस्य पवन दरगड, विजय गोदाम, संतोष गाढवे,शिवलिंग महाजन, अशोक गारटे, राधेश्याम सारडा,बाळासाहेब पांचाळ, केशव गाढवे,शिवम पिंपळे, सलाम कुरेशी,अमित निले, किरण वैद्य, धनंजय महाजन, देवानंद पिंपळे,व सर्व कार्यकर्ते गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेच होतील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ? बिहार पॅटर्नची चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीने महाराष्ट्रात निवडणुका लढवल्या आणि प्रचंड मोठा विजय मिळवला. आता या विजयानंतर सगळ्यांना एकच प्रश्न पडला आहे की, काय एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री केलं जाणार की देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रा होणार ? एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होण्याची शक्यता कमी असल्याचं राजकीय तज्ञांचं मत आहे. शिंदे यांच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद आहेच, पण कपाळावर काही चिंता ही आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने विजय झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, आघाडीचे कोणतेही निश्चित सूत्र नाही. सर्वाधिक जागा असलेल्या पक्षाचाच मुख्यमंत्री होईल असं काही नाही. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे विधानसभा निवडणुकीतील कल महायुतीच्या बाजूने असल्याचे शिंदे म्हणाले.

**भाजप सर्वात मोठा पक्ष**

महाराष्ट्रातील महायुतीच्या विजयात भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यानंतर शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांचा क्रमांक लागतो. त्यामुळे आता मुख्यमंत्री कोण होणार असा प्रश्न सर्वांना पडलाय. मुख्यमंत्री पदाबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. पण यावेळी मुख्यमंत्री निश्चितपणे भाजपचाच होणार असल्याचे भाजप कार्यकर्त्यांचा दावा आहे. त्यावरुन आता नितीश कुमार देखील चर्चेत आहेत.

महाराष्ट्रातील ही परिस्थिती २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीसारखी आहे. तेव्हा भाजपला ७४ जागा आणि जेडीयूला ४३ जागा मिळाल्या होत्या. मात्र भाजपने नितीशकुमार यांना मुख्यमंत्री केले होते. आता महाराष्ट्रात भाजप काय निर्णय घेते याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

**पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मनात काय ?**

भाजपला देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्री करायचे आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. पण एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्रीपदी राहावेत, अशी शिवसेनेची इच्छा आहे. भाजपने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करावे, असे काही लोकांचे मत आहे. त्यामुळे युती मजबूत होईल. मात्र देवेंद्र फडणवीस हे जास्त अनुभवी असल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. भाजपसाठी हा कठीण निर्णय असणार आहे. कारण युतीत फूट पडणार नाही याची काळजी भाजपला घ्यावी लागणार आहे.

# शिरूर तालुक्यात आ. सुरेश धसांच्या विजयाचा आंनदोत्सव

## होल्डिंग, बॅनर्स, फटक्यांची अतिशबाजी आणि गुलालाची उधळण

**शिरूर । शंकर भालेकर**

आष्टी -पाटोदा -शिरूर विधानसभा मतदार संघ निवडणुकीत महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांच्या मोठा मताधिक्याने विजय झाल्याने शिरूर शहरासह तालुक्यात भाजपनेते, पदाधिकारी,कार्यकर्ते, मतदार बांधवांच्या वतीने होल्डिंग, बॅनर्स, फटाक्याची अतिशबाजी आणि गुलालाची उधळण करून मोठा आंनदोत्सव साजरा करण्यात आला आहे.

आष्टी -पाटोदा -शिरूर विधानसभा मतदार संघामध्ये चार दिग्गज नेत्यांची चौरंगी लढत रंगली होती. सत्तेच्या सारिपाठावर कोण बाजी मारणार याची उत्कंठा जनतेला लागली होती. या निवडणूकीमध्ये महायुतीतील म्हणजे आ.बाळासाहेब आजबे, भाजप नेते माजी राज्यमंत्री सुरेश धस आणि भाजप जेष्ठनेते माजी आ.भीमराव धोंडे हे तीन दिग्गज नेते परस्परांच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते तर या सर्वांबरोबर टक्कर देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गटाचे ) मेहबूब शेख हे महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून निवडूक लढवत होते. या मुळे या मतदार संघामध्ये चौरंगी लढत रंगली होती.



जातीपातीच्या राजकारणाचे समीकरण पाहता ओबीसी नेता म्हणून माजी आ. भीमराव धोंडे यांच्याकडे पाहिले जायचे मतदारसंघातही मोठ्या प्रमाणात ओबीसी मतदान जनता भीमराव धोंडे यांना कौल देईल अशी चर्चा ऐकायला मिळायची. लोकसभा निवडणुकीमध्ये आ. पंकजा मुंडे यांचा झालेला पराजय हा ओबीसी बांधवांच्या जीवाला लागला होता. कोणत्याही पक्षातून मराठा उमेदवार उभा राहिला तर त्याला ओबीसी बांधव मतदान करणार नाही अशी चर्चाही मोठ्या प्रमाणात ऐकायला मिळायची. यामुळेच महायुती पक्षाचे उमेदवार सुरेश धस यांना ओबीसी बांधवांच्या मतदानाची धास्ती होती. त्यातच भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या भाषणा नंतर ही चर्चा उलटसुलट ऐकायला मिळायची. यामुळे ही निवडणूक भाजपाचे उमेदवार सुरेश धस यांना राजकीय वर्तुळातही बोलले जायचे मात्र प्रत्यक्षात निवडणुकीमध्ये उमेदवार सुरेश धस यांनी सुमारे ७५ हजार मताच्या वर मताधिक्य घेऊन आष्टी - पाटोदा -शिरूर या विधानसभा मतदारसंघावर आपले अस्तित्व कायम केले आहे. तर भाजपचा बालेकिल्ला म्हणून संबोधला जाणारा हा मतदार

संघ पुन्हा एकदा अबाधित केला आहे. प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल करून सुरेश धस यांनी मिळवलेला विजय हा भाजपा सह मित्र पक्षातील सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा आहे. यामुळे सुरेश धस यांच्या विजयाची घोषणा होण्या अगोदर शिरूर होल्डिंग, बॅनर्स लावून सुरेश धस यांना शुभेच्छा देण्यात आल्या तर प्रत्यक्षात विजय घोषित झाल्यानंतर शिरूर शहरासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये गुलालाची उधळण करून फटाक्याचे अतिश ही करण्यात आली आहे.

पान ६ वरून...

## केजच्या जनतेने निवडला

केज विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत विद्यमान भाजप महायुतीच्या उमेदवार सौ.नमिता अक्षय मुंदडा यांनी विजय संपादन केला.

केज मतदारसंघातील सर्व जनतेचे जाहीर आभार

केज विधानसभा निवडणुकीत मी, भाजपा महायुतीच्या वतीने उमेदवार होते. या निवडणुकीत आमच्या प्रचारार्थ केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री आदरणीय नितीन गडकरी, भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी प्रचार सभा घेतल्या तसेच भाजपा, महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे सन्माननीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी डोअर-टू-डोअर जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला. तसेच केज विधानसभा मतदारसंघातील जनतेने पुन्हा आम्ही केलेल्या विकासकामांना पुन्हा पसंती दिली. व मतदानरूपी आशीर्वाद दिले. निवडणूक प्रचार प्रक्रिया गतिमान करण्यासाठी मला ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व युवा नेते अक्षयजी मुंदडा यांची भक्कम साथ लाभली. त्यामुळे भाजपा महायुतीच्या विजयासाठी ज्यांनी ज्यांनी मदत, सहकार्य करून आशिर्वाद दिले त्या केज मतदारसंघातील सर्व जनतेचे जाहीर आभार.

- नमिता अक्षय मुंदडा
- (नवनिर्वाचित आमदार, केज विधानसभा मतदारसंघ, बीड.)

केज मतदारसंघात सर्वत्र जल्लोष :

केजच्या जनतेने पुन्हा प्रगतीचा मार्ग निवडत नमिता मुंदडा यांना विजयी केले. आपला विजयी कौल भाजपा महायुतीला दिला. शनिवारी मतमोजणीचा दिवस होता. मतमोजणीनंतर नमिता मुंदडा या विजयी झाल्याचे समजताच संपूर्ण मतदारसंघात नागरिक, महिला-भगिनी आणि युवक वर्गाने जागोजागी गुलाल उधळीत, फटाके फोडून, पेढे वाटून आपला आनंदोत्सव साजरा केला.

## अखेर आ.प्रकाश

सांगत निवडून देण्याचे भावनिक आवाहन केले होते.यामुळे सोळंके यांना सहानुभूती मिळाली होती.तरीही नवखे रमेश आडसकर यांनी चांगली

लढत दिली.केवळ ११ हजार मतांनी त्यांचा पराभव झाला होता. पराभवानंतरही

गत पाच वर्षांत एकही दिवस मतदारसंघ सोडला नाही व कायम जनतेच्या संपर्कात राहिले. मात्र,अजित पवार राष्ट्रवादीने भाजपसोबत महायुतीमध्ये प्रवेश केल्याने आडसकर यांचा पत्ता कट झाला.यामुळे आडसकर यांनी ऐनवेळी भाजपा सोडून शरद पवार गटात प्रवेश केला. मात्र,त्यांना तिकीट नाकारून शरद पवार गटाने भाजपमधून आलेलेच मोहन जगताप यांना उमेदवारी दिली. त्यामुळे आडसकर यांनी बंडखोरी केली.दुसरीकडे अजित पवार गटाचेमाधव निर्मळ,भाजपचे बाबरी मुंडे यांनी देखील बंडखोरी केली.यातच वंचितने मुस्लिम उमेदवार दिल्याने निवडणुकीत चुरस वाढली होती''

# टोमॅटोपासून वाईन ते विविध उपपदार्थ निर्मितीसाठी सरकार २८ प्रकल्पांना देणार निधी; किमती स्थिर ठेवण्यासाठी होणार लाभ

पुणे । पतिनिधी

**भारतातील टोमॅटो पुरवठा साखळी स्थिर करण्यासाठी, ग्राहकांना वर्षभर परवडणारी क्षमता आणि शेतकऱ्यांना चांगल्या किंमती मिळाव्यात यासाठी ग्राहक व्यवहार विभागातर्फे ३० जून २०२३ रोजी टोमॅटो ग्रँड चॅलेंज लाँच करण्यात आले होते. टोमॅटोच्या कचऱ्याचा वापर करून कीटकनाशके, कोटिंग मटेरियल आणि अगदी 'वाइन' तयार करण्याचे मार्ग शोधून काढणाऱ्या नवोदित उद्योजकांना यासाठी आवाहन करण्यात आले होते. यासाठी मिळालेल्या १,३७६ सबमिशनमधून २८ नवोदितांची यादी विभागाने अंतिम केली आहे. आता यासाठी मोठा निधी दिला जाणार आहे.**



भारत हा टोमॅटोचा जगभरातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे पण अतिरिक्त उत्पादनामुळे बहुतेक उत्पादन यामुळे बहुतेक माल वाया जातो, व कचऱ्याच्या समस्येचा सामना करावा लागतो. मूल्य साखळीच्या विविध टप्प्यांवर दरवर्षी सुमारे ३०-३५% टोमॅटो नष्ट होतात. किमतीतील अस्थिरता ही आणखी एक मोठी समस्या आहे, कारण पुरवठ्यातील व्यत्यय आणि हवामानाच्या बदलामुळे किमती वाढू शकतात. मोठ्या उत्पादनामुळे टोमॅटोच्या किमती साधारणपणे डिसेंबर ते मार्च दरम्यान घसरतात, परंतु उत्पादन कमी असताना जुलै ते नोव्हेंबर या काळात ते झपाट्याने वाढतात. यामुळे शेतकऱ्यांचे लक्षणीय नुकसान होते. टोमॅटोपासून जे उपपदार्थ तयार करता येतात त्यामध्ये वाइन ही एक नाविन्यपूर्ण कल्पना आहे आणि इतर उपायांसह, शेल्फ लाइफ सुधारून आणि कचरा कमी करून टोमॅटो मूल्य साखळीत बदल घडवून आणता येते. त्यामुळे आता किमती कोसळल्यावर शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन फेकून द्यावे लागणार नाही.'' टोमॅटोच्या कचऱ्यापासून बनविलेले जैव-कीटकनाशके, कोल्ड स्टोरेज तंत्रज्ञानातील प्रगती, उत्पादनांचे शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी सुधारित पॅकेजिंग पद्धती आणि प्रक्रिया केलेल्या टोमॅटो उत्पादनांची निर्मिती यांचा समावेश आहे. हे उपाय केवळ टोमॅटो शेतीतील आर्थिक आव्हानांना सामोरे जात नाहीत तर कीटकनाशकांचे अवशेष कमी करणे, स्वच्छ, सुरक्षित उत्पादनात योगदान देणे हे देखील त्यांचे उद्दिष्ट आहे. विशेष म्हणजे हे सर्व प्रकल्प कमी किमतीचे आहेत, आणि प्रकल्पाच्या गरजेनुसार नवीन उद्योजकांना २ ते ५ लाखांपर्यंत निधी देण्यात आला आहे. प्रयोग यशस्वी झाल्यास इतर कृषी क्षेत्रातील अशाच आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हे मॉडेल म्हणून काम करेल अशी अपेक्षा आहे.

# म्हशींच्या प्रजननासाठी हिवाळा ठरतो लाभदायक

**हिवाळा हा म्हशींच्या प्रजननासाठी सर्वांत अनुकूल ऋतू मानला जातो. राज्यातील हवामान, हिवाळ्यातील सौम्य तापमान आणि उष्णतेचा अभाव हे घटक प्रजननासाठी पोषक ठरतात.**



हिवाळा हा म्हशींच्या प्रजननासाठी सर्वांत अनुकूल ऋतू मानला जातो. राज्यातील हवामान, हिवाळ्यातील सौम्य तापमान आणि उष्णतेचा अभाव हे घटक प्रजननासाठी पोषक ठरतात. पशुपालकांनी या ऋतूचा योग्य फायदा घेण्यासाठी ठराविक योजना आखून काम करणे आवश्यक आहे.

सरासरीपेक्षा कमी तापमान, थंडीचा कालावधी, पाण्याची उपलब्धता, मुबलक हिरवा आणि वाळलेला चारा, हवेतील मध्यम आर्द्रता अशा वातावरणामुळे हिवाळा म्हशींच्या आरोग्य व प्रजननास हितावह ठरतो. हिवाळ्याच्या ३ ते ४ महिन्यांत आपल्याकडील प्रत्येक म्हशीचे प्रजनन सुरू आहे किंवा नाही याबाबत पशुपालकांनी जागरूक असावे. हिवाळ्यात प्रजनन क्रिया योग्य प्रकारे घडल्यास पुढे येणाऱ्या उन्हाळ्यासारख्या कडक व प्रतिकूल ऋतूचा म्हशींना विशेष अपाय होत नाही. हिवाळ्यात म्हशी माजावर येऊन गाभण ठरण्याकडे लक्ष दिल्यास म्हशींकडून दूध व वेत मिळण्याची निश्चिती करता येते. हिवाळ्यात गाभण म्हशींची विशेष काळजी घ्यावी लागत नाही. याउलट हिवाळ्यात प्रजनन बंद असलेल्या म्हशी पुढे उन्हाळ्यात चारा-पाण्याच्या अभावामुळे अशक्त होतात. त्यामुळे त्यांना पुढे पावसाळा संपेपर्यंत शरीर, आरोग्य राखणे शक्य होत नाही. हिवाळा संपला, तर पुढे वर्षभर म्हैस भाकड राहू शकते.

**हिवाळ्यातील पोषक हवामानाचे महत्त्व :**

हिवाळ्यातील कमी उष्णता आणि सौम्य थंड हवामानामुळे म्हशींच्या शरीरातील उष्णता नियमन सुरळीत होते. हे प्रजननासाठी पोषक वातावरण निर्माण करते. हिवाळ्यात उष्णतेमुळे होणारा तणाव टाळला जातो. त्यामुळे म्हशींच्या प्रजनन क्षमतेत वाढ होते. हिवाळ्यातील भरपूर चारा व पोषणमूल्ये युक्त आहारामुळे जनावरांची आरोग्यस्थिती सुधारते. प्रजननानंतर गाभण म्हशींच्या शरीरात हार्मोन्सची वाढ होते. त्यामुळे अधिक दूध उत्पादन शक्य होते.

**हिवाळ्यात प्रजनन यशस्वी करण्याचे उपाय :**

योग्य आहार व्यवस्थापन. चारा व पौष्टिक आहाराचा पुरवठा नियमित करावा. हिवाळ्यात ऊर्जा, प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वांनी समृद्ध आहार द्यावा. म्हशींच्या आहारात खनिज मिश्रणाचा समावेश करणे त्यांच्या आरोग्यासाठी आणि प्रजनन क्षमतेसाठी अत्यावश्यक आहे. हिवाळ्यात याचा योग्य वापर केल्यास म्हशींच्या प्रजननावर सकारात्मक परिणाम होतो. जनावरांना सुलभ प्रजननासाठी चांगले आरोग्य व सुदृढ प्रकृतिमानाची गरज असते. पोषक वातावरण, तसेच हिरवा व वाळलेला चारा मिळत असल्यामुळे म्हशी हिवाळ्यात धष्ट-पुष्ट होतात. खरीप पिकांचा चारा, हिरवे गवत, संतुलित आहार यामुळे म्हशीचे शारीरिक वजन वाढते.

# भाजीपाला पिकांचे असे करा व्यवस्थापन

**सध्याच्या ढगाळ वातावरणात भाजीपाला पिकावर वेगवेगळ्या रोगाचा आणि किडींचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. वेळीच या रोग आणि किडीचे व्यवस्थापन केले नाही तर नुकसान होऊ शकते.**

**भाजीपाला पिकाचे व्यवस्थापन :**



वेलवर्गीय भाजीपाला पिकांवर भुरीचा प्रादुर्भाव होऊन उत्पादन आणि गुणवत्तेत घट होऊ शकते. भुरी रोगावर प्रतिबंधात्मक उपाय हेच नियंत्रणाची सर्वात योग्य पद्धती आहे, कारण एकदा पिकावर या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रण करणे काठी असते, यासाठी वेलींचे सतत निरीक्षण करावे. भुरी रोग प्रतिकारक वाणांची लागवड करावी. नत्र खताच्या अति वापरामुळे भुरी रोगाची तीव्रता वाढते, तर पोटॅश खतामुळे पिकाची अंतर्गत रोग प्रतिकारशक्ती वाढून रोगाची तीव्रता कमी होते. यासाठी वेगवेगळ्या अन्नद्रव्यांचा समतोल प्रमाणात वापर करावा. दाटीवाटीने वाढलेल्या पिकामध्ये रोग प्रसारासाठी अनुकूल सूक्ष्म हवामान बनते व रोगाची तीव्रता वाढते यासाठी पिकांच्या ओळीमध्ये हवा खेळती राहील अशाप्रकारे रोपांची संख्या ठेवावी. भुरी रोगाच्या प्रतिबंधासाठी हवामानानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने, मेप्टिलडीनोकॅप (३७.५ ) फवारणी करा. ०.७ मिली किंवा हेक्साकोनाझोल (५ ईसी) १ मि.ली. किंवा डायफेनोकोनाझोल (२५ ईसी) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकांवरील फुलकिडी/थ्रीप्सचे नियंत्रण करण्यासाठी फिप्रोनिल १५ मिली प्रति १० लीटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. रोपवाटिकेत वांगी, मिरची, टोमॅटो इ. भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी,पेरणीनंतर १५दिवसांनी प्रति वाफा ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा द्यावी. भाजीपाला रोपे पुनर्लागवड करावयाच्या शेतात जमीन वाफसा स्थितीत असताना मशागतीची कामे सुरू करावीत. उन्हाळी कांद्याच्या लागवडीसाठी गादी वाफे करून रोपे तयार करण्यासाठी बियाणे पेरणी करावी व उन्हाळी हंगामासाठी शिफारशीत सुधारित जातींचा वापर करावा. बियाणे पेरणीपूर्वी अझोस्पिरिलम + पी.एस.बी. या जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. टोमॅटो पिकावरील करपा आणि रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी टेब्युकोनाझोल (२९.५) १ मिली अधिक फिप्रोनील (५) १.५ मि.ली.च्या किंवा थायामेथोक्सम (२५ डब्ल्यूजी) ०.४ ग्रॅम किंवा कार्बोसल्फॉन (२५ ईसी) १ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे बियाणे उगवल्यानंतर १० दिवसांच्या अंतराने आलटून पालटून दोन ते तीन वेळा फवारणी करावी.

# जमिनीतील उपयुक्त सूक्ष्म जिवाणूच तारतील शेतीला म्हणून वाढवा मातीमधील सेंद्रिय कर्ब

**निसर्ग हा जिवन देणारा व जिवन घेणारा तोच आहे. तसेच पिकांच्या पोषणामध्ये अन्नद्रव्य पुरतता होण्यासाठी मोलाची भूमिका निभावत असतो तो सुक्ष्म जिव म्हणजे जिवाणू! आपल्या जमिनीची सुपीकता अबाधित ठेवण्यासाठी जैविक तंत्राची मदत हाच शेतीचा आधार ठरू शकते. जमिनीमध्ये नैसर्गिकरीत्याचं जीवाणू, बुरशी यांसारखे असंख्य उपयुक्त सूक्ष्मजीव जिवाणू आढळून येतात. जमिनीमधील अन्नद्रव्य व इतर उपयुक्त घटक पिकाला उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे कार्य हे सूक्ष्मजीव करतात. सूक्ष्म जीवांनी परीपुर्ण असलेल्या मातीला जिवंत म्हणजे सजीव माती संबोधतात. मातीची सुपीकता व उत्पादकता वाढविण्यासाठी व ती अबाधित ठेवण्यासाठी उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या वाढण्यासाठी माती मधला कर्ब वाढवणं गरजेचं आहे.**



आपण केलेल्या अंधाधुंद रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीची जिवाणू च्या अन्नाची क्षमता कमी केली आहे. रासायनिक खतांच्या मुक्त वापरामुळे रसायनांचा अंश अन्नधान्यात उतरतो परिणामी विविध घातक आजार मानव व प्राणी यांना होतात.यालाच घाबरून सुरक्षित व सकस अन्नासाठी लोकांनी जैविक पद्धतींचा अवलंब केला आहे.जैविक खतांने जमिनीची नैसर्गिक व जैविक सुपीकता टिकण्यास मदत होते परिणामी पर्यावरणाचा समतोल राखला जातो.जिवाणू नी परीपुर्ण खतांमध्ये जमीन, पाणी व पिके यांसाठी घातक अशी कोणतीही रसायनं नसल्या मुळे उपयुक्त अशा सूक्ष्मजीव व मित्र किडींना कसलाही अपाय होत नाही.उपयुक्त असलेल्या जैविक खतांनी जमिनीत सोडलेल्या जिवाणू मुळे पिकाची रोग व कीड़ प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. सूक्ष्मजीवांनी उपयुक्त असलेल्या जैविक खतांनी जमिनीत सोडलेल्या संजीवकांमुळे बियाण्याची उगवणशक्ती वाढते व पिकाची वाढ चांगली होते.मर या आजाराला बळी पडत नाहीजैविक निविष्ठा जसे खतांच्या वापराने जमिनीचा पोत सुधारतो तसेच उत्पादनात १५ ते २० टक्क्यांनी वाढ होते.सेंद्रिय पदार्थ कुजण्यास मदत होते व नैसर्गिक पद्धतीने अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते त्याच बरोबर रोगांचेदेखील नियंत्रण होते.

जिवाणु च्या वापराणे उत्पादन खर्चात बचत होते.आता हेच पहा आपल्या भागातील पिकांच्या उत्पादनात घट येण्याच्या प्रमुख कारणांपैकी झिंक या सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असे तज्ञाच मत आहे समजून घेऊ झिंक विरघळविणारी जिवाणू व खते जमिनीतील खनिज स्वरूपातील झिंक विरघळवून पिकांना उपलब्ध करतात परिणामी उत्पादनात वाढ होते.आपल्या द्रवरुप जिवाणू संघ म्हणजे महाएनपिके नत्र, स्फुरद व पालाश उपलब्ध करणारे जिवाणू असतात आपन जर पिकं व्यवस्थापनासाठी नत्र, स्फुरद व पालाश उपलब्ध करणा-या जिवाणूंचा वापर करणे आवश्यक आहे. जिवाणू संघात उपरोक्त नत्र स्थिर करणारे जिवाणू, स्फुरद विरघळवणारे जिवाणू व पालाश उपलब्ध करणा-या जिवाणूंचा समावेश असतो. या जिवाणूंचे निर्जतुक वाहकामध्ये मिश्रण करून जिवाणू संघ तयार केला जातो. जिवाणू संघ हा पीकनिहाय तयार करता येतो व त्यामुळे शेतक-यांना वापरण्यासाठी जिवाणू संघ अतिशय उपयुक्त आहे. या सर्व गोष्टींचा आपन विचार करावा व सेंद्रिय व जैविक खतांच्या वापरात समतोल राखून जमिनीचा कस कमी होऊ न देता उत्पादन वाढ करणे ही काळाची गरज आहे. त्याच बरोबर जैविक खताचा वापर करणे हे फायदेशीर ठरू शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४३४ : थेम्स नदी पूर्णपणे गोठली.
१७५० : महाराणी ताराबाईंकडून छत्रपती राजारामास कैद
१८५९ : चार्ल्स डार्विनने आपला उत्क्रांतीचा सिद्धांत मांडणारा जगप्रसिद्ध ग्रंथ 'ओरिजिन ऑफ द स्पिशिज' प्रकाशित केला.
१८६४ : जळगाव नगरपालिकेची स्थापना.
१९२६ : आजच्याच दिवशी प्रख्यात तत्वज्ञानी महर्षी अरविंद यांना पूर्ण सिद्धी ची प्राप्ती झाली होती.
१९४४ : दुसरे महायुद्ध ८८ अमेरिकन विमानांनी टोकियोवर तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९६९ : अपोलो-१२ चंद्रावर उतरले.
१९७१ : डी. बी. कुपर याने चोरलेल्या २ लाख अमेरिकन डॉलर सह नॉर्थवेस्ट ओरीएंट एरलाईन्सच्या विमानातून पॅराशूटच्या सहाय्याने उडी मारली. परंतु कुपारचा अद्याप शोध लागलेला नाही.
१९७६ : तुर्कस्तान च्या पूर्व भागात भीषण भूकंप. यात ४ ते ५ हजार लोकांचे निधन.
१९८६ : आजच्याच दिवशी तामिळनाडू राज्यातील विधानसभेत एकाच वेळी सर्वच सदस्यांना सदनातून बरखास्त करण्यात आले होते.
१९८८ : पक्षांतर बंदी कायद्यान्वये पहिल्यांदा लोकसभा सदस्य लालदुहोमा यांना अयोग्य घोषित करण्यात आले होते.
१९९२ : कवी विंदा करंदीकर यांची साहित्यक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कोणार्क पुरस्कारासाठी निवड जाहीर
१९९२ : वैज्ञानिक संशोधनासाठीचा 'जी. डी. बिर्ला पुरस्कार' हैदराबाद विद्यापीठातील प्राध्यापक गोवर्धन मेहता यांना जाहीर
१९९२ : देवगड तालुक्यातील कवी माधव यांना पहिला 'कवी माधव पुरस्कार' जाहीर
१९९६ : इंडियन सायन्स कॉंग्रेस असोसिएशनचा 'आशुतोष मुकर्जी स्मृती पुरस्कार' ख्यातनाम अणूशास्त्रज्ञ राजा रामण्णा यांना जाहीर
१९९८ : समाजसेविकांना दिला जाणारा 'अहल्यादेवी होळकर पुरस्कार' आंबेडकरी चळवळीतील नेत्या आणि कार्यकर्त्या शांताबाई दाणी यांना
२००० : भारत आणि चीन दरम्यान असलेल्या प्रत्यक्ष ताबारेषेपैकी ५४५ किमी भागाच्या तपशीलवार नकाशांची प्रथमच देवाणघेवाण करण्यात आल्याचे परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी जाहीर केले.
२००१ : नेपाळ या देशात आजच्याच दिवशी स्थानिक पोलीस ,सैन्य व माओवादी यांच्यात चकमक होऊन ३८ पोलीस व सैनिक मारले गेले होते.
२००८ : आजच्याच दिवशी मालेगाव बॉम्बस्फो टातील संशयित आरोपी साध्वी प्रज्ञा सिंह यांनी ए टी एस या दहशतवाद विरोधी शोध पथकावर अश्लील चलचित्र दाखविल्याचा आरोप लावला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०६ : रग्बी फुटबॉलचे निर्माते विल्यम वेबल एलिस यांचा जन्म. (मृत्यू: २४ जानेवारी १८७२)
१८८१ : स्वाधीनता सेनानी छोटूराम यांचा आजच्या दिवशी जन्म झाला होता.
१८८१ : डेप्युटी कमिशनर बनणारे पहिले भारतीय कावसजी पेटिगारा यांचा जन्म झाला होता.
१८९४ : हर्बर्ट सटक्लिफ इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: २२ जानेवारी १९७८)
१८९९ : राजस्थान राज्याचे प्रथम मुख्यमंत्री व राजनेते हिरा लाल शास्त्री यांचा जन्म झाला होता.
१९१४ : लिन चॅडविक ब्रिटिश शिल्पकार, लोखंड, पोलाद, पितळ, प्लॅस्टर, काच आदी माध्यमांचा उपयोग करुन त्यांनी शिल्पे घडविली. (मृत्यू: २५ एप्रिल २००३)
१९३७ : मराठी भाषेतील लेखक, कवी, नाटककार आणि समीक्षक केशव मेश्राम यांचा जन्म.
१९४१ : भारतीय-इंग्लिश ड्रमर आणि गीतकार पेट बेस्ट यांचा जन्म.
१९५५ : इयान बोथॅम इंग्लंडचा क्रिकेटपटू
१९६१ : अरुंधती रॉय लेखिका व मानवाधिकार कार्यकर्त्या गुरू तेग बहादूर शिखांचे नववे गुरूगुरू तेग बहादूर शिखांचे नववे गुरू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६७५ : गुरू तेग बहादूर शिखांचे नववे गुरू, विविध विषयांवर त्यांनी सुमारे ११६ पदे रचली आहेत. (१ एप्रिल १६२१)
१९१६ : मॅक्सिम तोफेचे शोधक हिराम मॅक्सिम यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १८४०)
१९४८ : मदर्स डे च्या संस्थापिका ॲन्ना जर्व्हिस यांचे निधन. (जन्म: १ मे १८६४)
१९६३ : ली हार्वे ओस्वाल्ड राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीचा मारेकरी (जन्म: १८ आक्टोबर १९३९)
१९६३ : महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री (२० नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३), मारोतराव सांबशिव कन्नमवार यांचे कार्यालयात असतानाच निधन झाले. (जन्म: १० जानेवारी १९००)
२००३ : उमा देवी खत्री उर्फ 'टुन टुन' अभिनेत्री व गायिका (जन्म: १ जानेवारी १९२३)
२००४ : आर्थर हॅले इंग्लिश कादंबरीकार (जन्म: ५ एप्रिल १९२०)
२०१४ : भारतीय राजकारणी मुरली देवरा यांचे निधन. (जन्म: १० जानेवारी १९३७)

# मतदारांनी ६ महिन्यातच शरद पवार, ठाकरे-काँग्रेसला का नाकारलं?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा २०२४ च्या निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले आहेत. राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट मत दिलंय. महायुतीचे २०० पेक्षा अधिक उमेदवार विजयी झाले आहेत. तर दुसऱ्या बाजूला मविआला ५० जागाही मिळालेल्या नाहीत. महायुतीच्या झालेल्या या एकतर्फी विजयामुळे राजकीय विश्लेषकांकडूनही आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. याच महायुतीचा अवघ्या ६ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत डब्बा गूल झाला होता. तर मविआचे सर्वाधिक उमेदवार विजयी झाले होते. मात्र फक्त ६ महिन्यात असं काय झालं? ज्यामुळे मतदारांनी त्यांचा निर्णय बदलत महायुतीला साथ दिली? हे आपण काही मुद्द्यांमधून जाणून घेऊयात.

महाराष्ट्रात अनेक टप्प्यांमध्ये लोकसभेचं मतदान झालं. महाराष्ट्रात एकूण ४८ लोकसभा मतदारसंघ आहेत. अर्थात महाराष्ट्रातून देशाच्या संसदेत ४८ खासदार निवडून जातात. या लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये ४८ पैकी मविआच्या ३१ उमेदवारांचा विजय झाला होता. तर विधानसभा मतदारसंघनिहाय पाहायचं झालं तर मविआ १५१ जागांवर आघाडीवर होती. मात्र ६ महिन्यांमध्येच जनमत बदललं.

मविआला का नाकारलं?

राज्यात लोकसभा निवडणुकीत जो पक्ष जिंकतो, त्यांचंच सरकार बनवण्यात मतदार गेल्या २० वर्षांपासून निर्णायक भूमिका बजावत आला आहे. मात्र



२०२४ मध्ये अनेक उलटफेर पाहायला मिळाले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या पदरी निराशा पडली. मात्र त्यानंतरही भाजपने विविध पक्षांना सोबत घेत सरकार स्थापन केलं. त्याचाच परिणाम हा मतदारांवर झाला, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

एकनाथ शिंदे यांना का हटवावं?

हे सांगण्यात आणि पटवून देण्यात विरोधक अपयशी ठरले. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत पक्ष फोडला, असे आरोप करत विरोधकांनी हल्लाबोल केला. मात्र विरोधकांचा हा मुद्दा मतदारांना त्यांच्याकडे ओढू शकला नाही, हेच विधानसभेच्या निकालावरुन स्पष्ट होतं. मविआमध्ये जागावाटपावरुनही अनेक वाद पाहायला मिळाले. जागावाटपावरुन काँग्रेसचे नाना पटोले आणि ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यातही वाद पाहायला मिळाले.

विदर्भात काँग्रेस अपयशी

राज्यातील सत्तेचा मार्ग हा विदर्भातून जातो, असं म्हटलं जातं. मात्र काँग्रेस विदर्भात सपशेल अपयशी ठरली आहे. काँग्रेसचे विदर्भातील मातब्बर नेत्यांचा पराभव झाला आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यासमोर जातीच्या राजकारणाराचा काहीच फरक निकालातून दिसला नाही. जनतेने जातीऐवजी धर्माला प्राधान्य दिल्याचं या निकालातून अधोरिखत झालं.

लाडक्या बहिणींकडून परतफेड

एकनाथ शिंदे सरकारने राज्यातील महिलांना अचूक हेरलं. लाडकी बहिण योजनेअंतर्गत दरमहिना दीड हजार रुपये दिले. तर जिंकून आल्यानंतर दर महिन्याला २ हजार १०० रुपये देण्याचं आश्वासन दिलं. महिलांनी मतदान केलं. राज्यातील मतदानाचा टक्का वाढला. या वाढीव मतदानाचा फायदा हा महायुतीला झालाय, हे निकालानंतर सांगण्यासाठी कोणत्या राजकीय पंडिताची गरज नाही. महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यात लाडक्या बहिणींनी गेमचेंजिंग भूमिका बजावली, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही.

# राज्यात भाजपचा दणदणीत विजय फटाके फोडून जालन्यात विजयी जल्लोष

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला व महायुतीला मिळालेल्या यशामुळे जालना येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयासमोर कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी फटक्याची आतिशबाजी करून पेढे वाटून जल्लोष साजरा केला.



मिळालेले यश हे देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रमुख श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांनी केलेल्या परिश्रमाचे हे यश असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्यात मिळालेला विजय हा सर्वसामान्य कार्यकत्यांचा विजय आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशभरात केलेल्या विकास कामांमुळे जनतेचा त्यांच्यावरील विश्वास वाढला आहे. त्यांच्या हातात देश सुरक्षित आहे. विविध योजना आणून सर्वसामान्य जनतेला न्याय दिल्याने हा विजय मिळाला आहे. आजचा दणदणीत निकाल पक्षाच्या सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाला प्राधान्य देऊन विकास कार्माचे फळ आहे.

यावेळी विजय कामड, अर्जुन गेही, धनराज काबलीये, रविंद्र अग्रवाल, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, सुनील खरे, बाबुराव भवर, यांच्यासह असंख्य भाजपा कार्यकर्ते या विजय उत्सवात सहभागी झाले होते.

# बच्चू कडूंना पराभवाचा धक्का

अमरावती । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला राज्यात मोठं अपयश आलं होतं, मात्र त्यातून भरारी घेत विधानसभा निवडणुकीमध्ये मोठं यश मिळवलं आहे. महाविकास आघाडीला राज्यात पराभवाचा मोठा धक्का बसला आहे. मनसेला खातही उघडता आलं नाही, तर तिसऱ्या आघाडीच्या स्थापनेमध्ये मुख्य भूमिका असलेल्या बच्चू कडू यांचा देखील पराभव झाला आहे. अचलपूर विधानसभा मतदारसंघात बच्चू कडू यांना मोठा धक्का बसला आहे. पराभवानंतर पहिल्यांदाच त्यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली.



नेमकं काय म्हणाले बच्चू कडू?

सर्व कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो, त्यांनी माझ्यासाठी प्रयत्न केले. माझ्या या पराभवाने तुम्ही खचून जाऊ नका, बच्चू कडू पदामुळे नाही तर कार्यामुळे आहे. हे कार्य आपण पुढे करत राहू तुम्ही स्वतःला एकटे समजू नका. आज हरलो तरी उद्या आपण जिंकू, कुठे चुकलो असेल, कुठे कमी पडलं असेल त्याचा शोध घेऊ, असं बच्चू कडू यांनी कार्यकर्त्यांना म्हटलं आहे.

यावेळी अचलपूर मतदारसंघात तिरंगी लढत पाहायला मिळाली. महायुतीकडून भाजपचे प्रवीण तायडे हे निवडणुकीच्या रिंगणात होते. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे अनिरुद्ध देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली होती. तिसऱ्या आघाडीकडून बच्चू कडू यांनी या मतदारसंघात निवडणूक लढवली मात्र त्यांचा या मतदारसंघात पराभव झाला आहे. भाजपचे प्रवीण तायडे हे अचलपूर विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

**दिग्गजांचा पराभव**

या विधानसभा निवडणूक निकालाचं वैशिष्ट म्हणजे अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहे थोरात, यशोमती ठाकूर, माणिकराव ठाकरे यांचा पराभव झाला आहे. कोकणात शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला. विदर्भात देखील महाविकास आघाडीची पिछेहाट झाली. मनसेला तर खातं देखील उघडता आलं नाही, माहीममधून राज ठाकरे यांचे पूत्र अमित ठाकरे हे तिसऱ्या क्रमांकावर आहेत.

# नाना पटोले यांचा निसटता विजय

**साकोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विधानसभेचे धक्कादायक निकाल हाती येत आहेत. अनेक दिग्गजांचा या निवडणूकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा साकोलीत अवघ्या १५२ मतांनी निसटता विजय झाला आहे. त्यांनी भाजपाचे उमेदवार अविनाश आनंदराव ब्राह्मणकर यांचा पराभव केलेला आहे. साकोलीत नाना पटोले आणि अविनाश आनंदराव ब्राह्मणकर यांच्यात अटीतटीचा सामना झाला. त्यानंतर अवघ्या १५२ मतांनी नाना पटोले यांना आपला गड राखण्यात कसेबसे यश आलेले आहे. महाराष्ट्रात जेव्हा जागा वाटप सुरु होते, तेव्हा काँग्रेसचे नाना पटोले आणि शिवसेना उद्धव गटाचे नेते संजय राऊत यांच्यातील खडाजंगीने महायुतीतील मतभेद उघड झाले होते. त्यामुळे नाना पटोले यांच्या निवडणूकीकडे लक्ष लागले होते. अखेर नाना पटोले यांचा कसाबसा विजय झाला आहे.



# विधानसभा निवडणुकीत मनसेचा दारुण पराभव

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल आज समोर येत आहे. राज्यात महायुतीनी निकालात मोठी मुसंडी मारली आहे. महायुतीला २२० पेक्षाही जास्त जागांवर यश मिळताना दिसत आहे. महायुतीचा हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक विजय आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या दिग्गज नेत्यांचा पराभव झाला आहे. एकीकडे महायुतीचे यशाचं सर्वोच्च शिखर गाठलं आहे. तर महाविकास आघाडीतील घटक पक्षांना विरोधी पक्षनेते पदासाठी प्रत्येकी २९ आमदारांचा आकडा देखील पार करता आलेला नाही. महाविकास आघाडीला ५० पेक्षाही कमी जागांवर यश मिळताना दिसतोय. त्यामुळे हा निकाल धक्कादायक असल्याची जनतेमध्ये भावना आहे. या निकालावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

विशेष म्हणजे या निवडणुकीत मनसेला खातं देखील उघडता आलेलं नाही. याउलट मनसेचे एकमेव आमदार राजू पाटील यांचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला आहे. कल्याण ग्रामीणमध्ये शिंदे गटाचे राजेश मोरे यांचा विजय झाला आहे. मनसेला कुठेच यश मिळालेलं नाही. या निकालावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. राज ठाकरे यांनी 'एक्स'वर अवघ्या तीन अक्षरांत प्रतिक्रिया दिली आहे. ''अविश्वसनीय ! तूर्तास एवढेच'', अशी प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली आहे.



महाराष्ट्राचा आतापर्यंत निकाल काय?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल हा अतिशय अविश्वसनीय असाच लागला आहे. कारण महायुतीला तब्बल २३१ जागांवर यश मिळताना दिसत आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीच्या मातब्बर नेत्यांचा या निवडणुकीत पराभव झाला आहे. यामध्ये काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, धीरज देशमुख, यशोमती ठाकूर यांचा पराभव झाला आहे. तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले अवघ्या १५२ मतांनी जिंकून आले आहेत. तसेच विजय वडेट्टीवार हे देखील फार कमी मतांच्या फरकाने जिंकून आले आहेत. या निवडणुकीत भाजपने तब्बल १३० पेक्षा जास्त जागांवर मुसंडी मारली आहे. तर शिंदे गटाला देखील ५५ पेक्षा जास्त जागा मिळताना दिसत आहेत. तसेच अजित पवार गटाला देखील ४० पेक्षा जास्त जागांवर यश मिळताना दिसत आहे. तर महाविकास आघाडीत ठाकरे गटाला सर्वाधिक २०, काँग्रेसला १५ आणि शरद पवार गटाला १० जागांवर समाधान मानावं लागत असल्याचं चित्र आहे.



**जालना विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांना ३१ हजार मतांची लीड मिळून ते विजयी घोषित झाले व त्यांचे कट्टर समर्थक शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे व कार्यकर्ते जल्लोष करताना**

## जालन्यात खोतकर तर घनसावंगी उढान, बदनापूर नारायण कुचे, परतुर लोणीकर, भोकरदन संतोष दानवे

जालना । प्रतिनिधी

जालन्यात माजी मंत्री अर्जुन राव खोतकर यांनी विद्यमान आमदार कैलास गोरंट्याल यांचा पराभव करून अर्जुनराव खोतकर विजय झाले. घनसावंगी मध्ये माजी मंत्री राजेश टोपे यांनी यांना पराभूत करून हिकमत उढान विजय झाले. परतुर मध्ये भाजपाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी उद्धव सेनेचे आसाराम बोराडे आणि अपक्ष उमेदवार माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांचा पराभव केला. भोकरदन मध्ये भाजपाचे विद्यमान आमदार संतोष दानवे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या माजी आमदार चंद्रकांत दानवे यांचा पराभव केला. बदनापूर मध्ये भाजपाचे विद्यमान आमदार नारायण कुचे यांनी यापूर्वी दोन वेळा पराभूत झालेल्या बबलू चौधरी या शरद पवार गटाच्या उमेदवाराचा पुन्हा एकदा पराभव केला आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यामध्ये मनोज जरांगे चा फॅक्टर चा उलटा परिणाम झालेला दिसत आहे आणि दिसत आहे आणि पाच पैकी पाच जागा या महायुतीने जिंकल्या आहेत. विजया संदर्भात नुकतेच विजयी झालेले उमेदवार अर्जुन खोतकर यांनी लगेच विरोधकांना इशारा दिला आहे. ''स्वतः गाड्या फोडून माझी बदनामी करणाऱ्यांचे आता बघा मी काय करतो?''पत्रकारांशी बोलताना असं अर्जुन खोतकर म्हणाले

# अस्सल भाजपचा मुख्यमंत्री होईल ही आशा, उद्धव ठाकरे यांचा टोला

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. उद्धव ठाकरे म्हणाले की, 'तूर्त मी महाराष्ट्रातील जनतेला सांगतो निराश होऊ नका. खचून जाऊ नका. काही लोकांचं म्हणणं आहे हा ईव्हीएमचा विजय आहे. असूही शकतो. पण जनतेला निकाल मान्य असेल तर कुणालाच काही बोलण्याची गरज नाही. पण मान्य नसेल तर आम्ही प्राणपणाने लढत राहू, महाराष्ट्राच्या हितासाठी काम करत राहू. मी वचन देतो आम्ही तुमच्यासोबत आहोत.'

'लाडकी बहीणचा इम्पॅक्ट असेल तर बाकीच्या गोष्टी उघड होत्या. सोयाबीनला भाव नाही. कापूस खरेदी नाही, महिला असुरक्षित आहे, या असंख्य गोष्टी आहे. लाडकी बहीण पेक्षा आमच्यासभेला येणाऱ्या महिलांना घर कसं चालवायचं हा प्रश्न होता. महागाई वाढतेय म्हणून मतदान केलं का. हा टोमणा नाही. या वेळी तरी अस्सल भाजपचा



मुख्यमंत्री होईल अशी आशा आहे. महाराष्ट्र विकास आघाडी फार प्रामाणिक वागली हे चुकलं की काय असं वाटतं.'

'२८८ पैकी मोजलेल्या जागा किती आहेत. या जागा किती आहेत. अशाच काही जागा त्यांच्याकडे आहेत. अशी लाट उसळली असं काय काम त्यांनी केलं. ते जिंकले आहेत. पण त्यांचं अभिनंदन करण्यात कद्रूपणा करायचा नाही. मी त्यांचं अभिनंदन करतो. आता निवडणूक आयोगाने स्थगिती दिलेली लाडकी बहीण योजना पूर्ववत करून त्यात २१०० रुपये दर महिन्याला द्यावी, त्यांनी जी आश्वासने दिली ती पूर्ण करावी. निवडणुकीत असा जुमला करावा लागतो असं बोलू नये. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावं.' कोरोना काळात कुटुंबप्रमुखांप्रमाणे माझं ऐकणारा महाराष्ट्र असं वागेल असं वाटत नाहीये. कारण मी जे जे सांगत आलो त्याच तळमळीने मी महाराष्ट्राला मनापासून सांगितलं होतं. महाराष्ट्र असा वागेल असं काही वाटत नाही. काही तरी यात गडबड आहे. काही गोष्टी सेक्युलर असतात. बेकारी आहे, महागाई आहे. सर्वांनाच या गोष्टी सतावत असतात. असे ही उद्धव ठाकरे म्हणाले.

# काँग्रेसची धूळदान, पृथ्वीराज चव्हाण, यशोमती ठाकूर , बाळासाहेब थोरातांचा पराभव, महाराष्ट्रात महायुतीचा डंका

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मतमोजणी पार पडत आहे. या निवडणूक निकालात भारतीय जनता पक्षाला मोठे यश मिळाले आहे. राज्यात महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाल्याचे चित्र आहे. राज्यातील २८८ जागांपैकी २९९ जागांवर महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहेत, तर महाविकास आघाडीला केवळ ५४ जागांवर विजय मिळवता आला आहे.

कोणता पक्ष किती जागांवर आघाडीवर ?

भाजपने १३३ , शिंदेंची शिवसेना ५६, अजित पवारांची राष्ट्रवादी ४० जागांवर आघाडी आहे. महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत मोठा फटका बसलाय. काँग्रेस पक्ष केवळ २० , शरद पवारांच्या राष्ट्रवादी १५ जागांवर आघाडीवर आहे. त्यामुळे महायुतीने महाविकास आघाडीला जोरदार धक्का दिलाय.

दरम्यान, या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागलेच आहे. पण विशेष म्हणजे काँग्रेसच्या फायरब्रँड नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागलाय.

पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव



माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव झालाय. ते कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण विरुद्ध भाजपचे अतुल भोसले असा सामना रंगला होता. या लढतीत अतुल भोसले यांनी पृथ्वीराज चव्हाण यांचा दारुण पराभव केला आहे. कराड दक्षिणमध्ये १७ व्या फेरीनंतर अतुल भोसले यांनी ३८ हजार मतांचा लिड मिळवला होता. पृथ्वीराज चव्हाण यांना हा लीड तोडण्यात अपयश आलंय.

यशोमती ठाकूर यांचाही पराभव

माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनाही पराभवाचा सामना करावा लागला आहे. तिवसा विधानसभा मतदारसंघात भाजपने यशोमती ठाकूर यांच्याविरोधात राजेश वानखेडे यांना उमेदवारी दिली होती. राजेश वानखेडे यांच्याकडे २१ फेऱ्यांनंतर ८१९५ मतांचा लीड होता. अखेर आता यशोमती ठाकूर यांचा पराभव झाल्याचे निश्चित मानले जात आहे.

बाळासाहेब थोरात यांचा देखील पराभव

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना देखील पराभवाचा सामना करावा लागला आहे. बाळासाहेब थोरात सातत्याने या मतदारसंघातून निवडून आले आहेत. मात्र, यावेळी मतदारांनी त्यांचा आमदार बदलला आहे. बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात शिंदेंच्या शिवसेनेकडून अमोल खटाळ यांना उमेदवारी देण्यात आली होती. अमोल खटाळ यांनी थोरातांचा १० हजार ५६० मतांनी पराभव केलाय.

# अटीतटीच्या लढतीत मविआचे संदीप क्षीरसागर ५३२४ मतांनी विजयी

## संदीप क्षीरसागरांना १ लाख १ हजार ८७४ तर योगेश क्षीरसागरांना ९६ हजार ५३० मते मिळाली

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार संदीप क्षीरसागर आणि महायुतीचे उमेदवार डॉक्टर योगेश शिरसागर यांच्यामध्ये अटीतटीची लढत झाली या अटीतटीच्या लढतीत सुरुवातीला पुढे असलेले योगेश क्षीरसागर पंधराव्या फेरीनंतर बर फिर नंतर मागे पडले आणि त्यानंतर कायम संदीप क्षीरसागर यांची आघाडी कायम राहिली शेवटी २९ व्या फेरीला संदीप क्षीरसागर ५६४८ मतांनी आघाडीवर गेले पोस्टल मतदान मोजल्यानंतर संदीप क्षीरसागर यांच्या आघाडी ५३२४ वर आली या विजयानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांची उमेदवारी होती तर महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे डॉक्टर योगेश क्षीरसागर यांची उमेदवारी होती याशिवाय अपक्ष म्हणून शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप शिवसंग्रामच्या डॉक्टर ज्योती मिळते यांचीही उमेदवारी होती मात्र शेवटच्या टप्प्यात आणि दादा जगताप आणि डॉक्टर ज्योती मेटे मागे पडून शेवटची लढत आमदार संदीप क्षीरसागर व डॉक्टर योगेश क्षीरसागर या दोन चुलत बंधूंमध्ये झाली सुरुवातीच्या फेऱ्यामध्ये अकरा फेरीपर्यंत अकराव्या फेरीपर्यंत महायुतीचे डॉक्टर योगेश क्षीरसागर हे दहा हजार पाचशे मतांची आघाडी घेऊन ६१४४ मताची आघाडी घेऊन पुढे होते मात्र त्यानंतर महाविकास आघाडीचे आमदार संदीप क्षीरसागर ४८६८ मतांची लीड घेऊन पुढे आले त्यानंतर ही लीड वाढतच गेली अखेर १७ व्या फेरीत १०३३७ मतांनी संदीप क्षीरसागर आघाडीवर राहिले त्यानंतर ही लीड कमी होत गेली आणि शेवटी २९ व्या फेरी अखेर संदीप क्षीरसागर यांना यांची ५६४८ मतांनी आघाडी राहिली यावेळी संदीप क्षीरसागर यांना एक लाख १८७४ मते मिळाली तर डॉक्टर योगेश शिरसागर यांना ९६ हजार ५३० मते मिळाली. संदीप क्षीरसागर हे ५३२४ मतांनी विजयी झाले .शेवटपर्यंत या दोघांमध्ये चुरशिचा सामना रंगला .अपक्ष असलेले माजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप हे १५६१३ मतांच्या पुढे गेले नाहीत. तर शिवसंग्रामच्या डॉ.ज्योती मेटे याना ९७६८ मतावर समाधान मानावे लागले. स्वराज्य पक्षाचे कुंडलिक खांडे यांना ३३५९ मते मिळाली.



संदीप क्षीरसागर
१,०१८७४



योगेश क्षीरसागर
९६,५३०



अनिल जगताप
१५६१३



डॉ.ज्योती मेटे
९७६८



कुंडलिक खांडे
३३५९

### मनोज जरांगे पाटलांचा आशीर्वाद

संदीप क्षीरसागर यांच्या विजयानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सांगितले की मी सुरुवातीपासूनच मराठा आंदोलनाला सहभागी होतो. कधी मराठा आंदोलनाला विरोध केला नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांचा आशीर्वाद माझ्या पाठीशी होता. मराठा समाजानेही मला भरभरून मते दिली. याशिवाय सर्व समाज माझ्या पाठीशी होता. त्यामुळे माझा विजय निश्चित झाला.

### संदीप क्षीरसागर यांनी एकाकी झुंज दिली

महाविकास आघाडीचे संदीप क्षीरसागर यांनी एकाकी झुंज दिली. त्यांच्या परिवारातील मोठे काका माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, त्यांचे वडील रवींद्र शिरसागर ,बंधू हेमंत क्षीरसागर ,चुलत बंधू डॉ. योगेश शिरसागर ही सर्व मंडळी विरोधात असतानाही संदीप क्षीरसागर यांच्यासोबत केवळ माजी आमदार सय्यद सलीम हे होते. मात्र जनता त्यांच्यासोबत होती आणि काही प्रमाणात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचाही त्यांना ऐनवेळी फायदा झाला. या सर्व बाबींचा परिणाम म्हणून आमदार संदीप क्षीरसागर विजयी झाले.



## आ.संदिप क्षीरसागर विजयी ; लिंबागणेशकरांचा जल्लोष

लिंबागणेश । प्रतिनिधी

राज्यभरात महायुतीचा गाजावाजा होत असला तरी बीड विधानसभा मतदारसंघातुन आ.संदिप क्षीरसागर विजयी झाले असुन बालाघाटावरील मतदारांनी संदिप क्षीरसागर यांना मताधिक्य दिले असुन विजयी झाल्यानंतर लिंबागणेश येथे शिवतीर्थ याठिकाणी आतिशबाजी करत घोषणाबाजी करत जल्लोष साजरा केला.संपुर्ण बालाघाट तुतारीमय झाला आहे. यावेळी विक्की वाणी, प्रमोद रणखांब, अँड.गणेश वाणी,अक्षय वाणी,बाळासाहेब मोरे, प्रकाश जाधव,अशोक वाणी,अक्षय वाणी, महावीर वाणी, सुभाष वाणी, महेश ढास, भास्कर ढास,राजेंद्र ढास, विजय थोरात,विजय आगवान, गणेश मुळे, पोखरीचे सरपंच बिभिषण मुळीक, चव्हाण वाडा सरपंच योगेश चव्हाण, पिंपरनई उपसरपंच बबन मोहिते, आदि उपस्थित होते.

## परतूर विधानसभा मतदार संघातून बबनराव लोणीकर विजयी

जालना । प्रतिनिधी

परतुर विधानसभा मतदार संघातून बबनराव लोणीकर ४७४० मताने विजय झाले आहे. परतूर मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील जवाहर नवोदय विद्यालय, अंबा, ता. परतुर येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. ९९-परतूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना ७०,६५९ मते मिळाली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे.पाटील) यांना ६५,९१९ इतकी मते मिळाली. तसेच काँग्रेस पक्षाकडून बंडखोरी करून ते अपक्ष उमेदवार सुरेशकुमार जेथलिया यांना ५३९२१ मते मिळाले. यात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) हे ४,७४० मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिभा गोरे यांची उपस्थिती होती.



## नमिता मुंदडा यांचा विजयश्री खेचून आणण्यात ॲड. शोभाताई लोमटे यांचा सिंहाचा वाटा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदार संघाच्या भाजपाच्या उमेदवार नमिता मुंदडा यांचा विजय खेचून आणण्यात ॲड शोभाताई सुनीलकाका लोमटे यांचा सिंहाचा वाटा ठरला आहे.केज मतदार संघात भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार यांच्यात सरळ लढत झाल्याचे पाह्यला मिळाले.



ॲड. शोभाताई सुनील काका लोमटे यांनी आमदार नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ व त्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करून महत्वाची भूमिका बजावली.सर्व जाती धर्मातील मतदारांना सोबत घेऊन मुंदडा यांना विजयी करण्याचे आवाहन केले. आमदार मुंदडांनी गेल्या पाच वर्षात केलेली हजारो कोटीची विकास कामे प्रचारादरम्यान मतदारांपर्यंत पोहंचवली .नमिता मुंदडा यांना निवडून आणणे किती महत्वाचे आहे हे समजावून सांगितले.

मतदारसंघाचा विकास आणि सामाजिक समतोल राखून आ.मुंदडा यांनी सर्व समाजातील लोकांना सोबत घेऊन कामे केल्याचे सांगितले. मुंदडा यांना अधिकाधिक मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन ॲड शोभाताई सुनिलकाका लोमटे यांनी केले होते.आ.नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ शहरातील कुत्तरविहीर,रवीवारपेठ,लालनगर व शहरातील प्रमुख चौकात प्रचारसभा आयोजित करण्यात आल्या होत्या. सुनिलकाका लोमटे यांनी शहरात कामे करतांना सर्व समाजाच्या व्यक्तींना सोबत घेऊन विकासाभिमुख कामे केली. तोच वारसा ॲड शोभाताई लोमटे यान पुढे चालू ठेवून नमिता मुंदडा यांच्या विजयासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली आहे.नमिता मुंदडा यांच्या विजयानंतर फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला.

## केजच्या जनतेने निवडला पुन्हा मार्ग प्रगतीचा ; कौल भाजपा महायुतीला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**केजच्या जनतेने निवडला पुन्हा प्रगतीचा मार्ग निवडला. आपला विजयी कौल भाजपा महायुतीला दिला. कामगिरी दमदार म्हणून नमिताताई मुंदडा यांना सुज्ञ जनतेने पुन्हा आमदार केले.**

विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीच्या उमेदवार आ.नमिताताई मुंदडा या १ लाख १५ हजार ६८९ मते घेऊन विजयी ठरल्या असून, यानंतर नागरिकांनी पुन्हा मार्ग केजच्या सर्वांगिण प्रगतीचा म्हणून स्वागत केले. केज मतदारसंघात आ.नमिताताई मुंदडा व माजी आमदार पृथ्वीराज साठे अशी सरळ लढत झाली. या निवडणुकीत सर्व प्रमुख पक्षाचे नेते अन्? कार्यकर्ते मुंदडांच्या विरोधात होते. विरोधकांच्या खोट्या प्रचाराला व भुलथापांना बळी न पडता सुजाण मतदारांनी आ.नमिता मुंदडा यांनी मागील ५ वर्षांत मतदारसंघात जवळपास २ हजार कोटींची विकासकामे केली. या कामांमुळे सामान्य मतदार मात्र विकासाच्या मुद्यांवर मुंदडांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा होता आणि आहे हे या निकालातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. या लढतीत जवळपास ३ हजार पेक्षा अधिक मतांची आघाडी घेऊन नमिता मुंदडा या विजयी झाल्या आहेत. केज विधानसभा मतदार संघात मतमोजणी प्रक्रिया आज कुठलाही अनुचित प्रकार न होता अतिशय शांततेत पार पडली.




कामगिरी दमदार म्हणून नमिताताई मुंदडा झाल्या पुन्हा आमदार






# अखेर आ.प्रकाश सोळंकेंनी गड राखला

## चुरशीच्या लढतीत शरद पवार गटाच्या मोहन जगतापांचा पराभव

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी चुरसीच्या लढतीत आपला गड राखला आहे. त्यांनी शरद पवार गटाचे राष्ट्रवादीचे उमेदवार मोहन जगताप यांचा ५ हजार ८७१ मताने पराभव केला. विशेष म्हणजे, पहिल्या फेरीपासून पंधराव्या फेरीपर्यंत मोहन जगताप आघाडीवर होते. त्यानंतर १६ व्या फेरीपासून अखेरच्या २९ व्या फेरीपर्यंत सलग आघाडी घेत प्रकाश सोळंके यांनी हा विजय प्राप्त केला.

आ.प्रकाश सोळंके यांनी राजकीय निवृत्ती घेत पुतण्याला वारसदार घोषीत करून त्यांनाच उमेदवारी द्यावी मी लढणार नाही असे जाहीर केल्यानंतर ही पक्षाने प्रकाश सोळंके यांनाच उमेदवारी दिली. तर त्यांच्या विरोधात शरद पवार गटाने भाजपातून आलेल्या मोहन जगताप यांना उमेदवारी दिली.या सोळंके आणि जगताप अशी थेट लढत होत असताना अपक्ष रमेश आडसकर, माधव निर्मळ आणि बाबरी मुंडे यांनी या निवडणुकीत चुरस वाढवली.अपक्ष उमेदवार किती मते घेतात यावर सोळंके आणि जगताप यांच्या विजयाचे चित्र अवलंबून होते अशी शक्यता मतमोजणी आधी वर्तविण्यात आली. मात्र,शेवटी सोळंके आणि जगताप या दोघांतच शेवटच्या फेरीपर्यंत लढत झाली.पहिल्या फेरीपासून पंधराव्या फेरीपर्यंत मोहन जगताप आघाडीवर होते. त्यानंतर १६ व्या फेरीपासून अखेरच्या २९ व्या फेरीपर्यंत सलग आघाडी घेत प्रकाश सोळंके यांनी विजय मिळवला.तर त्यांच्या विरोधात मागील निवडणूक भाजपाकडून लढलेले अपक्ष उमेदवार रमेश आडसकर हे तिसऱ्या स्थानी राहिले.



पहिल्या फेरीपासून पंधराव्या फेरीपर्यंत मोहन जगताप आघाडीवर









**विजयी उमेदवारांसह पराभूत उमेदवारांना मिळालेली मते**

आ.प्रकाश सोळंके - ६६ हजार २११
मोहण जगताप -६१ हजार ००७
बाबरी मुंडे -१७ हजार ३९५
माधव निर्मळ -३३ हजार ७९९
रमेश आडसकर -३७ हजार १६८

### निवडणुकीत चुरस तरीही आ.सोंळकेनी मिळवला विजय

मागील विधानसभा निवडणुकीत भाजपचे रमेश आडसकर यांच्या उमेदवारीमुळे विजय मिळवणे जड जात होते. त्यामुळे प्रकाश सोळंके यांनी मतदारसंघात प्रत्येक सभे दरम्यान ही आपली शेवटची निवडणूक असल्याचे ◀◀ पान ३ वर






This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे शहर आणि जिल्ह्यामध्ये महायुतीचा वरचष्मा

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचा निकाल लागला. यंदाच्या निकालात पुणे शहर आणि जिल्ह्यामध्ये महायुतीचा वरचष्मा दिसून आला. पुणे जिल्ह्यातील २१ मतदारसंघामध्ये ६१.०५ टक्के मतदान झाले. जिल्ह्यात अजित पवार, चंद्रकांत पाटील, दिलीप वळसे-पाटील यांच्यासह अनेक मातब्बरांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली होती.



**कसबा**
हेमंत रासने भाजप- विजयी
रवींद्र धंगेकर काँगेस - पराभूत
गणेश भोकरे, मनसे - पराभूत

**कोथरूड**
चंद्रकांत पाटील विजयी, चंद्रकांत मोकाटे, शिवसेना युबीटी - पराभुत
किशोर शिंदे, मनसे - पराभूत

**पर्वती**
माधुरी मिसाळ,भाजप - विजयी, अश्विनी कदम, राष्ट्रवादी डझ - पराभूत

**पुणे कॅन्टोन्मेंट**
सुनील कांबळे, भाजप - विजयी
रमेश बागवे, काँगेस - पराभूत

**वडगाव शेरी**
सुनील टिंगरे -राष्ट्रवादी -झ पराभुत
बापू पठारे- राष्ट्रवादी डझ विजयी

**खडकवासला**
भीमराव तापकीर, भाजप - विजयी
सचिन दोडके, राष्ट्रवादी डझ - पराभूत
मयुरेश वांजळे , मनसे- पराभूत

**शिवाजीनगर**
सिद्धार्थ शिरोळे, भाजप - विजयी
दत्ता बहिरट, काँग्रेस - पराभूत

**हडपसर**
चेतन तुपे - राष्ट्रवादी -झ विजयी
प्रशांत जगताप - राष्ट्रवादी डझ पराभूत, साईनाथ बाबर, मनसे - पराभूत

**बारामती**
अजित पवार राष्ट्रवादी -झ -विजयी
युगेंद्र पवार राष्ट्रवादी डझ - पराभूत

**इंदापूर**
दत्ता भरणे, राष्ट्रवादी -झ विजयी
हर्षवर्धन पाटील, राष्ट्रवादी डझ पराभूत

**आंबेगाव**
दिलीप वळसे पाटील -राष्ट्रवादी -P विजयी, देवदत्त निकम -राष्ट्रवादी SP पराभूत, जुन्नर शरद सोनवणे अपक्ष - विजयी. अतुल बेनके अजित पवार गट - पराभूत, सत्यशील शेरकर शरद पवार गट - पराभूत

**शिरुर**
माउली कटके, राष्ट्रवादी अजित पवार गट - विजयी
अशोक पवार, राष्ट्रवादी शरद पवार गट - पराभूत

**पुरंद**
रविजय शिवतारे, शिवसेना -विजयी
संजय जगताप, काँग्रेस - पराभूत

**भोर**
शंकर मांडेकर, अजित पवार गट - विजयी, संग्राम थोपटे, काँग्रेस - पराभूत.

**मावळ**
सुनील शेळके अजित पवार गट - -विजयी, बापू भेगडे अपक्ष - पराभूत.

**पिंपरी**
अण्णा बनसोडे, अजित पवार गट - विजयी, सुलक्षणा शिलवंत, शरद पवार गट - पराभूत

**चिंचवड -**
शंकर जगताप, भाजप - विजयी, राहुल कलाटे, शरद पवार पक्ष - पराभूत

**भोसरी -**
महेश लांडगे, भाजप - विजयी, अजित गव्हाणे, शरद पवार गट - पराभूत **खेड-** बाबाजी काळे, शिवसेना णइढ - विजयी., दिलीप मोहिते पाटील अजित पवार गट - पराभूत

# इंदापूर विधानसभेत आमदार दत्तात्रय भरणे यांची हॅट्ट्रिक

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर विधानसभेची निवडणूक पहिल्यांदाच तिरंगी झाल्याने अतिशय अटीतटीची मानली जात होती; परंतु आमदार दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यातील केलेला विकास, तालुक्यातील लाडक्या बहिणींचा मिळलेला प्रचंड प्रतिसाद व ओबीसी समाज बांधवांनी दिलेली एकजुटीची साथ, यामुळे आमदार दत्तात्रय भरणे यांनी सलग तीन वेळा इंदापूर विधानसभेत यश मिळवत हॅट्रिक निर्माण केलेली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे उमेदवार व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा पवार गटाचे उमेदवार आमदार दत्तात्रय भरणे व अपक्ष उमेदवार प्रवीण माने या तीन उमेदवारामध्ये प्रामुख्याने विधानसभेत लढत झाली. बहुतेक कौल माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या बाजूने येताना दिसले. त्यामुळे हर्षवर्धन पाटील विजयी होतील, असे मागील काही दिवसांपासून बोलले जात होते; मात्र करण्यात आलेले निवडणुकीतील मतांचे सर्वे खोटे ठरवत, पहिल्या फेरीपासून सतराव्या फेरीपर्यंत २२१२४ मतांची आघाडी आमदार भरणे यांनी घेतली. तर विसाव्या फेरीत आमदार भरणे यांनी ९७२७१ मते मिळवली. हर्षवर्धन पाटील यांना ७६५४६ मते मिळाली, त्यामुळे २०,७२५ मताधिक्य राहिले होते. व २१ व्या फेरीत भरणे यांना १,०१७५० तर हर्षवर्धन पाटील यांना ८११२९ इतके मतदान मिळाले. त्यामुळे आमदार भरणे यांचा विजय निश्चित मानला गेला. यामध्ये खर्या अर्थाने अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांनी पहिल्यांदाच विधानसभेची निवडणूक लढवून देखील चांगली मते पदरात पाडून घेतली. प्रवीण माने अपक्ष उभा राहिले नसते तर, कदाचित हर्षवर्धन पाटील विजयी झाले असते. प्रवीण माने २१ फेरीपर्यंत ३२,९८२ मते घेतली होती. आमदार भरणे यांना उजनी जलाशयाचा बॅकवॉटर परिसर, तसेच भिगवन पासून हिंगणगाव पर्यंत मतदारांनी मोठी साथ दिली आहे. तर गोखळी, तरंगवाडी, झगडेवाडी गावाने आधीचे मतदान देत आमदार भरणे यांचे रेकॉर्ड मोडले. इंदापूर शहराने आमदार दत्तात्रय भरणे यांना ५२८ मतांचे लीड दिले. ज्या प्रमाणात अपेक्षा होती, त्या प्रमाणात साथ दिल्यामुळे, विजयाचा मार्ग आमदार दत्तात्रय भरणे यांचा सुकर झाला. तालुक्यातील वालचंदनगर, बावडा, भिगवण व इंदापूर शहरात कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी करत, आनंद व्यक्त केला आहे. आमदार भरणे हे सरकारमध्ये सामील होणार असून, त्यांना नक्कीच लाल दिव्याची गाडी मिळेल, मंत्रीपद मिळेल असा आशावाद कार्यकर्ते बोलून दाखवत होते. यावेळी पुणे जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, युवक नेते श्रीमंत ढोले, अभिजीत तांबिले, दीपक जाधव, संजय सोनवणे, दत्तात्रय घोगरे, संग्राम पाटील, यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# मावळात पुन्हा, सुनीलअण्णा

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये विद्यमान आमदार सुनील शेळके यांनी पुन्हा एकदा विजयश्री खेचून आणली आहे. गतवेळीपेक्षा अधिकचे मताधिक्य मिळवून आमदार शेळके यांनी ऐतिहासिक विजय संपादित केला आहे.



मावळ विधानसभा मतदारसंघाची एकूण २९ फेऱ्यांमध्ये मतमोजणी संपन्न झाली. पहिल्या फेरीपासून ते अखेरच्या फेरीपर्यंत शेळके आघाडीवर राहिले. फेरीनिहाय शेळकेंची आघाडी वाढतच राहिली आणि अखेर एकोणतीसाव्या फेरीपर्यंत सुनील शेळकेंनी लाखाहून अधिकचे मताधिक्य घेत विजय निश्चित केला. पोस्टल मतांमध्ये एकूण ७९२ मते प्राप्त झाली होती, त्यापैकी वैध असलेल्या ७६३ मतांपैकी शेळके यांनी ५२४ मते घेत आघाडी घेतली. मतमोजणीत सुनील शेळके यांना एकूण १ लाख ९१ हजार २५५ मते मिळाली. तर प्रमुख विरोधी उमेदवार अण्णा उर्फ बापू जयवंतराव भेगडे यांना ८२ हजार ६९० मते मिळाली. यंदाच्या निवडणुकीतील विशेष बाब म्हणजे यापैकी कोणीही नाही (नोटा) या पर्यायाला नागरिकांनी २७१५ इतकी मते दिली आहेत. सुनील शेळके यांनी ऐतिहासिक अशा १ लाख ८ हजार ५६५ इतक्या फरकाने विजय मिळविला आहे.

# श्रीगोंद्यातून दिंड्यांचे आळंदीकडे प्रस्थान



**रांजणगाव सांडस । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील उरळगाव, दहिवडी, पारोडी, रांजणगाव सांडस, आलेगाव पागा आदी गावांसह श्रीगोंदा तालुक्यातून येणाऱ्या विविध दिंड्यांनी कार्तिक एकादशीनिमित्त आळंदीकडे प्रस्थान केले. उरळगाव, दहिवडी, पारोडी, शिवतक्रार म्हाळुंगी आदी गावात मुक्कामाच्या ठिकाणी हरिपाठ, प्रवचन, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम होत आहेत. दिंडी सोहळ्यात ज्येष्ठ तसेच महिला वारकरी, तरुण वर्गाची उपस्थिती आहे. दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांना सकाळी नाश्ता, दुपारी जेवण, चहा, मुक्कामाच्या ठिकाणी जेवण दिले जात आहे.

# कोथरूड विधानसभा मतदारसंघातून चंद्रकांत पाटील विक्रमी मतांनी विजयी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकीतील विजयाचे सर्व श्रेय नरेंद्र मोदीजी, अमितभाई शाह, जेपी नड्डाजी महाराष्ट्रातील जनतेचे आणि कोथरूडकर जनतेचे आहे, अशी भावना उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज व्यक्त केली. कोथरूड मधील विजयानंतर चंद्रकांतदादा पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला.




आमदार चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, विधानसभा निवडणुकीतील महायुतीचा विजय हा देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमितभाई शाह, जेपी नड्डाजी, आमचे सर्वांचे नेते एकनाथजी शिंदे, देवेंद्रजी फडणवीस, अजितदादा पवार, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि महाराष्ट्रातील जनतेचे आहे. या विजयाने लोकसभा निवडणुकीतील कसर धुवून निघाली अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. कोथरुड मधील विजयाबद्दल बोलताना पाटील पुढे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत कोथरूडकरांची मनापासून सेवा केली. कोथरुड मधील प्रत्येक कुटुंबाशी जोडला गेलो. त्यामुळे आजचा माझा विजय हा कोथरूड मधील प्रत्येक नागरिकाचा आहे. कोथरूड मधील जनतेची पुन्हा त्याच जोमाने सेवा करेन, अशी भावना व्यक्त केली.

# बारामतीत राष्ट्रवादीचा मोठा जल्लोष



**बारामती । प्रतिनिधी**

बारामती विधानसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवव्या फेरी नंतर ४४ हजाराचे लीड मिळविल्या नंतर बारामती शहरातील भिगवण चौकात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात एकच जल्लोष सुरु केला.

कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत एकमेकांना पेढे भरवत विजेयाचा आनंदोत्सव सुरु केला. गेल्या दोन दिवसांपासून बारामती शहर आणि तालुक्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अभिनंदनाचे बॅनर मोठ्या प्रमाणात लागले होते. सकाळच्या सत्रात अजित पवार यांचे मताधिक्य वाढल्यानंतर शेर आणि परिसरात ठीक ठिकाणी कार्यकर्त्यांकडून एकच जल्लोष करण्यात आला. विविध घोषणांनी बारामती शहर आणि परिसर दणाणून गेला होता.

# राहुल कुल यांच्या हॅटट्रिकमुळे राहू गावात जल्लोष

**राहू । प्रतिनिधी**

आमदार राहुल कुल यांच्या राहू गावात कुल समर्थकांनी मोठा जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी, गुलाल-भंडाऱ्याची मुक्तपणे उधळण, साऊंडच्या तालावर जल्लोष साजरा करण्यात आला.

आमदार राहुल कुल यांचा बालेकिल्ला असणाऱ्या राहू बेटातुनच सुरुवातीला त्यांना मोठे मताधिक्य मिळाले. ते कमी करण्यात विरोधी उमेदवार रमेश थोरात यांना अखेरपर्यंत यश आले नाही. आजपर्यंतच्या राजकीय इतिहासात राहू बेटाचे मताधिक्य हे नेहमीच कुल कुटुंबीयांच्या विजयासाठी निर्णायक ठरले आहे. आमदार राहुल कुल, कांचन कुल आणि कुटुंबीयांनी राहू येथील ग्रामदैवत शंभू महादेवाचे सकाळी दर्शन घेतले. कार्यकर्त्यांची मोठी गर्दी त्यांच्या निवासस्थानी होत होती. दुपारी एकनंतर आमदार राहुल कुल यांच्यासह त्यांच्या समर्थकांचा ताफा दौंडच्या दिशेने रवाना झाला.



दौंडच्या पश्चिम पट्ट्यातील अनेक गावांमध्ये मुख्य चौकांत फटाक्यांची मुक्तपणे आतषबाजी, गुलालाची उधळण करत कुल समर्थक आनंदामध्ये न्हाऊन गेले होते. दौंड तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोठमोठे फ्लेक्स लावून आमदार राहुल कुल यांच्या अभिनंदन कौतुक होत होते.

कुल समर्थकांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा केला. राहू परिसरात आम्ही घरोघरी विजयाची गुढी उभारणार असल्याचे कुल समर्थकांनी या वेळी सांगितले. कुल कुटुंबीयांची सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेली आहे. भरीव विकासकामे केल्याने मतदारांनी त्यांच्या कामाची उतराई केल्याचे कुल समर्थक पृथ्वीराज जगताप, नवनाथ सोनवणे, विठ्ठल बर्वे यांनी सांगितले.

# राहुल कुल यांच्या विजयाचा जल्लोष करताना माजी उपसरपंचाचा मृत्यू



**दौंड । प्रतिनिधी**

दौंड विधानसभा मतदारसंघाचे दिवंगत आमदार सुभाष बाबूराव कुल यांच्या अकाली निधनानंतर बाळासाहेब भोसले यांनी राहुल कुल यांच्या मार्गदर्शनाखाली गार - बेटवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंचपद व गार विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्षपद भूषविले होते. आमदार राहुल कुल यांचे एकनिष्ठ पदाधिकारी म्हणून त्यांची तालुक्यात ओळख होती. दौंड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या विजयसभेत नूतन आमदार राहुल कुल यांनी बाळासाहेब भोसले यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

# शिरुर आंबेगाव मतदार संघातील करंदीत तणावाचे वातावरण

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरुर आंबेगाव मतदार संघामध्ये महाविकास आघाडीचे देवदत्त निकम व महायुतीचे दिलीप वळसे पाटील अशी लढत होऊन महायुतीचे दिलीप वळसे पाटील विजयी झाल्यानंतर महाविकास आघाडीच्या शंकर जांभळकर यांच्या बंगल्यासमोर येत महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जांभळकर यांच्या वाहनांसह बंगल्यावर गुलाल टाकत घोषणाबाजी केल्याची धक्कादायक घटना घडल्याने काही तणाव निर्माण झाला आहे.



करंदी ता. शिरुर हे शिरुर आंबेगाव मतदार संघातील शिरुर तालुक्यातील बेचाळीस गावातील एक गाव, सदर गावातील बाजार समितीचे माजी सभापती असलेले शंकर जांभळकर हे राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवार गटात राहिले आणि त्यांनी महाविकास आघाडीचे देवदत्त निकम यांचा जोरदार प्रचार करत निवडणुकीला सामोरे गेले. दरम्यान निकाल जाहीर होताच देवदत्त निकम यांचा निसटता पराभव होऊन अकराशे मताने महायुतीचे दिलीप वळसे पाटील विजयी झाले मात्र यावेळी करंदीतून शंकर जांभळकर यांच्या कष्टाने निकम यांना एकशे पन्नास हून अधिक मतांची आघाडी मिळाली. मात्र विजयाचा जल्लोष साजरा करत असताना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गावामध्ये डीजे वाजवत माजी सभापती शंकर जांभळकर यांच्या बंगल्यासमोर येत घोषणाबाजी करुन शंकर जांभळकर यांच्या वाहनांसह त्यांच्या बंगल्यावर तसेच गेटच्या आतमध्ये गुलाल फेकत जल्लोष केला. दरम्यान शंकर जांभळकर यांच्या कुटुंबीयांनी याबाबत महायुतीच्या कार्यकर्त्यांना जाब विचारला असता जांभळकर यांच्या कुटुंबियांना देखील दमदाटी करण्यात आल्याने खळबळ उडत काही तणाव निर्माण झाला. तर याबाबत बोलताना आपण शिक्रापूर पोलीस निरीक्षकांशी बोललो असून सदर घटनेचे चित्रीकरण व फोटो पोलिसांना देऊन या कृत्यातील व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत तक्रार दाखल करणार असल्याचे माजी सभापती शंकर जांभळकर यांनी सांगितले.

# मुलाची रणनीती अन् वडिलांचा विजय

# बापूसाहेब पठारेंच्या विजयात सुरेंद्र पठारे किंगमेकर

**विंश्रातवाडी । प्रतिनिधी**

राज्यभरासह पुणे अन् पश्चिम महाराष्ट्रात महायुती आणि भाजपचा झंझावात असताना पुण्यात मात्र एका तरुणाने आपल्या रणनीतीच्या जोरावर वडिलांच्या गळ्यात विजयाची माळ घातली. वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बापूसाहेब पठारे विजयी झाले. विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांचा ४७१० मतांच्या फरकाने पराभव झाला.

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून पुण्यातील वडगावशेरी विधानसभा मतदारसंघ चर्चेत होता. महायुतीकडून ही जागा भाजपच्या जगदीश मुळीक यांना जाणार की विद्यमान आमदार सुनील टिंगरे हेच वडगाव शेरीचे आगामी उमेदवार असणार यावरून जोरदार चर्चा रंगली होती. अखेरीस सुनील टिंगरे यांनी पुन्हा उमेदवारी मिळवली आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरले. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अनुभवी उमेदवार असलेल्या बापूसाहेब पठारे यांना उमेदवारी दिली. आणि तेव्हापासून वडगावशेरीचा सामना अटीतटीचा होईल अशी शक्यता वर्तवली गेली. आणि प्रत्यक्षात झाले ही तसेच. मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर सुनील टिंगरे यांनी आघाडी घेतली होती. मात्र शेवटच्या टप्प्यात बापूसाहेब पठारे यांनी आघाडी मोडून काढत तब्बल ४७१० मतांच्या फरकाने विजय मिळवला. दरम्यान स्थानिक असलेले बापूसाहेब पठारे माजी आमदार राहिले. सरपंच ते आमदार असा त्यांचा प्रवास राहिला. मात्र मागील काही वर्षे ते काही कारणास्तव राजकारणापासून लांब राहिले. वडगावशेरी २०१४ आणि २०१९ च्या निवडणूकीत भाजपचे जगदीश मुळीक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनिल टिंगरे यांनी विजय मिळवला होता. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत बापूसाहेब पठारे पुन्हा राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी विधानसभेचे तिकीट मिळवलं आणि त्यात ते विजयी झाले. विधानसभेच्या या लढाईत



बापूसाहेब पठारे यांना मुलाची साथ लाभली ती म्हणजे मुलगा सुरेंद्र पठारे यांची. सुरेंद्र पठारे हे देखील मागील काही वर्षापासून वडगावशेरीचा राजकारणात सक्रिय आहेत. या संपूर्ण परिसरात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. मतदारसंघातील प्रत्येक छोट्या मोठ्या कामात त्यांनी सहभाग घेत अडचणी सोडण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी आंदोलने ही केली आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले. गेल्या काही वर्षांपासून सुरेंद्र पठारे यांनी मतदार संघात आपला जनसंपर्क वाढवत कामाला सुरूवात केली. प्रत्येक गोष्टीत सहभागी होत त्यांनी मतदार संघातल्या अडचणी जाणून घेतल्या व सोबतच पर्यायाने त्या सोडविण्यासाठी लढा उभारला आणि आंदोलने केली. पुण्यातील सीईओपी महाविद्यालयातील गोल्ड मेडलिस्ट असलेल्या सुरेंद्र पठारे यांनी मागील काही वर्षात संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. दीड महिन्यांपासून ते पायाला भिंगरी लागल्यासारखी फिरत होते. आणि त्याचा परिणाम विजयात झाला. वडील बापूसाहेब पठारे यांच्या गळ्यात त्यांनी विजयाची माळ घातली.